मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३८ ■ मंगळवार, १२ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# राष्ट्रीय लोक अदालतीत ७ हजार ७८ प्रकरणे निकाली

## २०.५५ कोटींची तडजोड

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : दाखलपूर्व व प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा तसेच सामोपचाराने वाद मिटावेत या उद्देशाने रायगड जिल्ह्यात 9 मे 2026 रोजी राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेंद्र द. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या लोक अदालतीत वादपूर्व व दाखल अशी एकूण 7 हजार 78प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये तब्बल 20कोटी 55लाख 20 हजार 615 रुपयांची तडजोड करण्यात आली.

राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र द. सावंत यांच्या हस्ते झाले. यावेळी अलिबाग येथील न्यायिक अधिकारी, वकील संघटनेचे उपाध्यक्ष अनंत पाटील, सचिव अमित देशमुख तसेच जिल्ह्यातील न्यायिक अधिकारी, वकील वर्ग आणि पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या



निर्देशानुसार देशभरात राष्ट्रीय लोक अदालत घेण्यात आली. रायगड जिल्ह्यात या लोक अदालतीसाठी 25 हजार 681 वादपूर्व आणि 12 हजार 194 प्रलंबित अशी एकूण 37 हजार 875 प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी4 हजार 59वादपूर्व आणि 3 हजार 19 प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले.

संपन्न झालेल्या लोक अदालती दरम्यान पाली येथील एका जोडप्याचा कौटुंबिक वाद मिटून त्यांचा संसार पुन्हा सुरळीत झाला. प्रमुख जिल्हा न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी या जोडप्याचे अभिनंदन केले. दरम्यान, जिल्ह्यातील 21 मोटार अपघात प्रकरणांत तडजोड होऊन संबंधित पक्षकारांना 2कोटी 28 लाख 62 हजार रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली.

लोक अदालतीसाठी जिल्ह्यातील विविध न्यायालयांमध्ये 27 कक्ष स्थापन करण्यात आले होते. काही प्रकरणांमध्ये पक्षकारांना न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलद्वारेही सुनावणी घेऊन प्रकरणे निकाली काढण्यात आली.

या उपक्रमाला अलिबाग वकील संघटना तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका वकील संघटनांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लोक अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी न्यायिक अधिकारी, वकील, न्यायालयीन कर्मचारी, जिल्हा परिषद, रायगड पोलीस प्रशासन आणि सर्व पक्षकारांचे सहकार्य लाभल्याबद्दल प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी आभार मानले.

# पनवेल पंचायत समितीतील दस्तऐवज व्यवस्थापन व अपूर्ण इमारत बांधकामाबाबत तातडीने दखल घेण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**दीपक कोलवणकर** : पनवेल पंचायत समितीला भेट दिल्यानंतर तेथील कागदपत्रे व शासकीय दस्तऐवजांच्या जतनाबाबत गंभीर स्थिती दिसून आली. अनेक वर्षांपासून जतन केलेली महत्त्वाची कागदपत्रे योग्य प्रकारे व्यवस्थापित नसल्याचे निरीक्षणात आले. शासकीय अभिलेख ही अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाची बाब असून त्यांची सुरक्षितता व योग्य देखभाल करणे प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे.

दस्तऐवजांच्या अशा अवस्थेमुळे प्रशासकीय कामकाज, पारदर्शकता आणि भविष्यातील संदर्भ यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने चौकशी करून आवश्यक सुधारात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

तसेच, पनवेल पंचायत समितीच्या इमारतीचे बांधकाम अनेक वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. हे बांधकाम नेमके का रखडले आहे, त्यामागील कारणे काय आहेत,



आणि काम पूर्ण होण्यासाठी निश्चित कालमर्यादा काय आहे — याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी.

लोकांच्या करातून उभारल्या जाणाऱ्या शासकीय इमारतींचे प्रकल्प दीर्घकाळ प्रलंबित राहणे योग्य नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन पारदर्शक माहिती जाहीर करावी आणि इमारत बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करावे.ही बाब नागरिकांच्या हिताशी संबंधित असल्याने प्रशासनाने सकारात्मक व तातडीने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

# कोकण विकासाचा कणा मजबूत! उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या हस्ते रोहा- अष्टमीला विकास भूदान

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग रेवदंडा निलेश फुंडे प्रतिनिधी** : कोकण हा विकासाचा कणा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी भूमिपूजनानंतर बोलताना कोकणाच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. "कोकण हा महाराष्ट्राच्या विकासाचा कणा आहे. येथील पायाभूत सुविधा, पर्यटन, उद्योग आणि रोजगारनिर्मितीसाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे," असे त्या म्हणाल्या. कोकणातील रस्ते, वीज, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षणासह सर्वच क्षेत्रांत शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. "कोकणवासीयांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. या विकासकामांमुळे स्थानिक तरुणांना स्थानिकच रोजगार मिळेल आणि पर्यटनाला नवा आयाम मिळेल," असा



विश्वास त्यांनी व्यक्त केला. रोहा-अष्टमी नगर परिषद हद्दीत रस्ते रचना, जलपुरवठा योजना, उद्याने आणि बाजारपेठ सुधारणा यांसारख्या विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले असून, यामुळे स्थानिक पायाभूत सुविधा बळकट होणार आहेत.

*तटकरे कुटुंबाचा भावनिक सूर*

कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांसह रायगड जिल्ह्यातील अनेक नेते व पदाधिकारी उपस्थित होते. खासदार सुनिल तटकरे यांनी भाषणात दिवंगत नेते अजित दादांच्या कार्याचा उल्लेख करत भावनिक होत म्हटले, "आता दुसरे दादा होणे शक्य नाही. मात्र त्यांनी दिलेली दूरदृष्टी आणि विकासाचा विचार आम्ही पुढे घेऊन सातत्याने काम करत राहणार आहोत." रायगडसह संपूर्ण कोकणाच्या विकासासाठी पक्ष आणि शासन एकत्रितपणे कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "अजित दादांच्या स्वप्नांना खऱ्या करत कोकणाला समृद्ध करण्यासाठी आम्ही झटणार आहोत," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

**मोठी उपस्थिती व नागरिकांचा उत्साह**

या कार्यक्रमाला रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, अल्पसंख्याक महामंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, सभापती विजया बाशीलकर, महाड नेत्या स्नेहल जगताप, रोहा-अष्टमी नगराध्यक्षा वनश्री शेडगे, जिल्हा परिषद सदस्य व मुख्य प्रतोद अमित नाईक उपस्थित होते. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने हजर होते. विविध विकासकामांची सविस्तर माहिती देण्यात आली असून, स्थानिक नागरिकांनी या कामांचे जोरदार स्वागत केले. "अशा विकासकामांमुळे आमच्या गावाला नवसंजन मिळेल," अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

या विकासकामांमुळे रोहा-अष्टमी आणि परिसरातील जीवनमान उंचावेल असा अपेक्षित आहे. कोकणाच्या विकासाच्या या मोहिमेत स्थानिकांचा सहभाग वाढत असल्याने भविष्यात आणखी मोठी कामे अपेक्षित आहेत.




# पनवेल तालुका पोलीस ठाण्यात मोहल्ला कमिटी बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर** : पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मोहल्ला कमिटी सदस्य व मशीद , मदरसा ट्रस्टी यांची बैठक वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.या बैठकीला मार्गदर्शन करताना वपोनि गजानन घाडगे यांनी सांगितले की, बकरी ईद सणाचे अनुषंगाने योग्य सूचना व मार्गदर्शन केलेले आहे. बकरी ईद निमित्ताने कुर्बानी व इतर कार्यक्रम होत असल्यास पोलिसांना व संबंधित विभागांना आगाऊ माहिती देणे. कायदेशीर परवानगी घेणे. व परवानगीत दिलेल्या अटी शर्तीनुसार सण उत्सव साजरा करणे. नशा मुक्ती, सायबर क्राईम, मार्गदर्शन केले आहे. गावातील अडीअडचणीवर चर्चा करून गावातील



ज्येष्ठ नागरिक ,महिला , मुले यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने माहिती दिली आहे. गावातील व परिसरातील संशयित वस्तू ,वाहने , इसम तसेच अवैद्य धंद्यांची माहिती देणे. मशीद , मदरसा येथे आत बाहेर सीसीटीव्ही बसविणे. पोलीस बतावणे बाबत चर्चा व मार्गदर्शन केले आहे. ग्रामीण भागातील नवतरुण मुलं मुले पोलीस खात्यात भरती होण्याकरता मार्गदर्शन केले आहे. सदर बैठकीला मोहल्ला कमिटी सदस्य/ मशीद, मदरसा ट्रस्टी उपस्थित होते.

# कोनगाव हद्दीतील रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने तसेच पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांतदादा ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या आमदार निधीतून नागरी सुविधा योजनेअंतर्गत पळस्पे जिल्हा परिषद मतदारसंघातील कोनगाव हद्दीतील रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन सोमवार दिनांक ११ मे २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाले.

ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत , जे. एम. म्हात्रे आणि प्रीतम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई अतुल घरत यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्र राज्य भारतीय जनता पार्टी वाहतूक संघटना उपाध्यक्ष अतुल घरत यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले. तसेच कोनगाव ग्रामपंचायत सरपंच. अश्विनी जितेश शिसवे यांच्या प्रमुख



उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

यावेळी ज्येष्ठ नेते . कैलाशजी म्हात्रे, माजी सरपंच विठ्ठल गातारे, माजी उपसरपंच. दीपक म्हात्रे, जितेश शिसवे, सदस्य . अक्षय घरत, कु. साहिल म्हात्रे, नितीन म्हात्रे, संतोष गातारे, दत्ता म्हात्रे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानिक नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने हा रस्ता महत्त्वाचा ठरणार असून परिसराच्या विकासाला चालना मिळणार असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# पिंपळदरी येथे निकृष्ट दर्जाचा पांदण रस्ता करून लाटले लाखो रुपये

## चौकशी करून कार्यवाही करण्यासाठी शेतकऱ्यांचे निवेदन




**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : उमरखेड तालुक्यातील पिंपळदरी येथील गाव ते महादेव मंदिरापर्यंत सन २०२३-२४ मध्ये करण्यात आलेल्या पांदण रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे. या निवेदनावर २८ शेतकरी व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याच्या कामात गिट्टी व मुरमाचा योग्य वापर करण्यात आला नाही. तसेच पाणी टाकून रोलरद्वारे दाबणी न केल्यामुळे रस्ता अल्पावधीतच उखडल्याचे निदर्शनास आले आहे. कामाबाबत ग्रामसभेत माहिती मागितली असता ठेकेदाराने टाळाटाळ केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.निकृष्ट कामामुळे सार्वजनिक निधीचा गैरवापर झाल्याचा संशय व्यक्त करत संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून इस्टिमेटनुसार रस्ता पुन्हा करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदनात स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, पुढील १५ दिवसांत रस्त्याची दुरुस्ती व आवश्यक कार्यवाही न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे,तसेच या निवेदनाच्या प्रती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून पुढील कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# दिलीप ठाकूर यांच्या "कायापालट" कार्यक्रमाचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नांदेड ग्रामीण तालुका प्रतिनिधी : संभाजी सूर्यवंशी** : तब्बल ७५ महिन्यांपासून संयोजक धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून जगावेगळा उपक्रम सातत्याने सुरू असून, आतापर्यंत ३७०० पेक्षा अधिक बेसहारा, निराधार आणि मानसिकदृष्ट्या खचलेल्या व्यक्तींचा कायापालट करण्यात आला आहे. निराशेच्या गर्तेत अडकलेल्या काहींना रोजगार उपलब्ध करून दिला. या कार्याच्या अमृत महोत्सवी पर्वात अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले.




नांदेड शहरात सोमवारी गोवर्धन घाट परिसरात एक वेगळंच दृश्य पाहायला मिळालं .ना राजकीय सभा, ना मोठा सत्कार, ना गाजावाजा ,पण एका आरशासमोर बसलेल्या बेसहारा व्यक्तीच्या डोळ्यांत मात्र अनेक वर्षांनी चमक दिसत होती! केसांचा गुंता, वाढलेली दाढी, अंगावरची मळकट वस्त्रं आणि चेहऱ्यावर निराशेची राख... पण काही तासांतच तोच चेहरा स्वच्छ, नीटनेटका आणि आत्मविश्वासाने उजळलेला दिसला. हे शक्य झाले "कायापालट" या अनोख्या मानवतावादी उपक्रमामुळे!

या उपक्रमाला माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे व ॲड. चैतन्य देशमुख, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, महानगराध्यक्ष अमर राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे व ॲड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, जिल्हा सरचिटणीस विजय येवणकर, शीतल खांडील, विजय गंभीरे, सुषमा थोरात तसेच लायन्स उपप्रांतपाल योगेश जायस्वाल यांचे मार्गदर्शन लाभते. भाजपा नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल आणि अमरनाथ यात्री संघ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम दरमहा राबविण्यात येतो.

या दिवशी दिलीप ठाकूर सह अनेक स्वयंसेवक अक्षरशः "देवदूत" बनले होते. स्वयंसेवक राजू अण्णा यांनी बेसहारांची कटिंग आणि दाढी करून त्यांना नव्या रूपात आणले. महेंद्र शिंदे यांनी स्वतः पुढे येत स्नान घातले, तर स्वच्छ पाण्याची व्यवस्था कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांनी केली. दिलीप ठाकूर यांच्या तर्फे नवीन कपडे, चहा-फराळ आणि प्रत्येकाला १०० रुपयांची बक्षिसी देण्यात आली.

स्नेहलता जायस्वाल यांनी गरमागरम खिचडी वाटप केली तर सुभाष बंग यांनी देवी बनियन देऊन सहकार्य केले. आरोग्याची विशेष काळजी घेत डॉ. अर्जुन मापारे आणि डॉ. दि. बा. जोशी यांनी मोफत तपासणी व औषधोपचार केले.

या उपक्रमाला हैदराबाद येथील सरोज व पुष्पराज जायस्वाल, नागपूरचे ॲड. अभय अवधीया आणि प्रवीण अवधीया यांनी सदिच्छा भेट देऊन दिलीप ठाकूर यांचे तोंड भरून कौतुक केले. उपक्रम संपल्यानंतर संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभुदास वाडेकर, सुरेश शर्मा, अरुण काबरा आणि शिवा लोट यांनी विशेष परिश्रम घेतले.

शहरात अनेक कार्यक्रम होतात. पण काही कार्यक्रम केवळ बातमी राहत नाहीत — ते माणुसकीचा आरसा बनतात! "कायापालट" हा त्यापैकीच एक... जिथे फक्त चेहरा नाही, तर आयुष्य बदलण्याचा प्रयत्न केला जातो.

# दर्यापूरात १३ मे रोजी 'हुंकार स्त्री शक्तीचा' जाहीर प्रबोधन सभा

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** सकल हिंदू समाज, दर्यापूर व गोपाल पाटील अरबट मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या बुधवार, १३ मे २०२६ रोजी दर्यापूर येथे 'हुंकार स्त्री शक्तीचा' या नावाने भव्य जाहीर प्रबोधन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. लव जिहाद, छुपे धर्मांतर व महिला सुरक्षा या ज्वलंत विषयांवर या सभेत मार्गदर्शन केले जाणार आहे.

ही सभा १३ मे २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजता कन्या शाळेचे मैदान, बस स्थानकासमोर, दर्यापूर, जि. अमरावती येथे होणार आहे.

या सभेच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून गुजरातमधील प्रखर हिंदुत्ववादी वक्त्या मा. काजल हिंदुस्थानी दीदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. आयोजक श्री. गोपाल पाटील अरबट यांनी माहिती दिली.

समाजातील वाढत्या लव जिहादच्या घटना, छुपे धर्मांतराचे प्रकार आणि महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर





बनत चालला आहे. या पार्श्वभूमीवर समाजात जनजागृती करण्यासाठी ही सभा आयोजित करण्यात आली आहे. "महिला ही जाणीव, संघटित आणि सजग राहणे ही काळाची गरज आहे," असे आयोजकांनी स्पष्ट केले.

दर्यापूरच्या इतिहासात पहिल्यांदाच मोठ्या संख्येने माता-भगिनी एकत्र येऊन "लव जिहाद पासून लेकीचे रक्षण" यावर निर्धार करणार आहेत, असे आयोजकांचे म्हणणे आहे.

"हा विषय प्रत्येक आई-वडिलांच्या लेकीच्या सुरक्षिततेशी संबंधित आहे. मोठ्या संख्येने उपस्थित राहून सभेला यशस्वी करा," असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ही सभा सामाजिक प्रबोधनाची असून सर्व नागरिकांनी शांतता, शिस्त व संयम राखून मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अशी विनंती सकल हिंदू समाज व गोपाल पाटील अरबट मित्रपरिवार यांच्या वतीने करण्यात आली आहे.

**पत्रकारांसाठी विशेष व्यवस्था**

पत्रकार बांधवांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली असून, आपापली उपस्थिती राहून सभेचे वार्तांकन करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क: श्री. गोपाल पाटील अरबट मित्रपरिवार, सकल हिंदू समाज, दर्यापूर. मो. 9975781333

# पाथरी पुनर्वसन येथे माया पिरॅमिड केंद्राचे उद्घाटन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -पवनी तालुक्यातील पाथरी पुनर्वसन येथे माया पिरॅमिड ध्यान केंद्राचे उद्घाटन आज दिनांक 10 मे 2026 ला सकाळी 11 वाजता करण्यात आले. सदर पिरॅमिड ध्यान केंद्राचे उद्घाटन डॉ. चारमोडे गंगोत्री पिरॅमिड सेंटर लाखनी, हिरा बांगडे राजनांदगाव, माया पिरॅमिड केंद्राचे संचालक सोमेश्वर गोस्वामी,सौ. ललिता लांजेवार ,जया कपाले, वैशाली डरवाल ,खोब्रागडे मॅडम, रश्मी पांडे,राजश्री कुसरे,गजानन गाऊत्रे ,नारायण खापेकर ,ॲडव्होकेट संतोष लांजेवार, खोब्रागडे मॅडम,नागपूर,यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. सदर ध्यान केल्यामुळे तन स्वस्थता होते, मनाची शांती ,बुद्धीचा विकास, आत्म्याला आनंद मिळतो. सदर ध्यान




केंद्राच्या ग्रामीण व शहरी भागात प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने या ध्यान साधना केंद्राची सुरुवात करण्यात आलेली आहे. कार्यक्रमाचे संचालन एडवोकेट संतोष लांजेवार यांनी केले तर आभार गजानन गोत्रे नागपूर यांनी मानले.यावेळी बऱ्याच संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते व सहभोजनाची सुद्धा व्यवस्था करण्यात आली होती.

# कामगार मंत्री ॲड .आकाश फुंडकर यांच्या हस्ते डॉ . वाकोडे यांच्या रुग्ण सेवेचा रावणकर हॉस्पिटल येथे शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : डॉ. मोनिष वाकोडे आणि डॉ. नेहा फाटे (वाकोडे) यांच्या डॉ. रावणकर मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल येथील सेवेचा शुभारंभ राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड आकाश फुंडकर यांच्या हस्ते झाला.

अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांसह उत्तमोत्तम आरोग्य सेवा येथे उपलब्ध झाल्या आहेत. डॉ. वाकोडे दांपत्याच्या रुग्णसेवेचा गरजू रुग्णांना निश्चित लाभ होईल, असा विश्वास पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी यावेळी व्यक्त केला.

डॉ. मोनिष वाकोडे आणि डॉ. नेहा फाटे (वाकोडे), डॉ. दीपक मोरे, दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह



बँकेचे माजी अध्यक्ष रामेश्वर फुंडकर,तुकाराम वाकोडे,डॉ. शंकरराव वाकोडे,इंजि. गजानन फाटे,ॲड. विनोद फाटे,डॉ. अमोल रावणकार आदी उपस्थित होते.

मधुमेह, उच्च रक्तदाब,हृदयविकार,दमा व श्वसन विकार, थायराईड विकार,किडनी विकार,ताप व संसर्गजन्य आजार,स्ट्रोक व आपातकालीन उपचार,लिव्हर चे आजार ,विषबाधा व सर्पदंश,२४ तास अत्यावश्यक सेवा,अतिदक्षता विभाग उपलब्ध करण्यात आल्याची माहिती रुग्णालय व्यवस्थापनाने दिली.

# कामगार चळवळीला नवे नेतृत्व! अखिल भारतीय विकास माथाडी ट्रान्सपोर्ट संघटनेच्या वाशिम जिल्हाध्यक्षपदी मोहन कोल्हे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगारांच्या न्यायहक्कांसाठी सातत्याने लढा देणाऱ्या अखिल भारतीय विकास माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार संघटनेच्या वाशिम जिल्हाध्यक्षपदी मोहन रमेश कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनिष जनार्दन लांजेवार यांनी अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.

मोहन कोल्हे यांच्या नियुक्तीमुळे वाशिम जिल्ह्यातील माथाडी, ट्रान्सपोर्ट व इतर असंघटित क्षेत्रातील कामगारांना सक्षम नेतृत्व लाभले असून, त्यांच्या प्रश्नांना आता संघटित पद्धतीने आवाज मिळणार असल्याची भावना कामगारांमध्ये व्यक्त होत आहे. कामगारांच्या वेतन, सुरक्षा, रोजगार, सामाजिक हक्क आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी



संघटनेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे काम केले जाणार आहे.

संघटनेच्या विस्तारास गती देणे, नव्या कामगारांना संघटनेशी जोडणे, कामगारांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचवणे आणि विविध प्रलंबित प्रश्नांवर ठोस पाठपुरावा करणे या उद्देशाने ही नियुक्ती करण्यात आल्याचे नियुक्तीपत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. मोहन कोल्हे यांना सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा मोठा अनुभव असून, त्यांनी यापूर्वीही विविध स्तरांवर कामगारांच्या प्रश्नांसाठी सक्रिय भूमिका बजावली आहे.

वाशिम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर माथाडी आणि ट्रान्सपोर्ट क्षेत्रातील कामगार कार्यरत आहेत. या कामगारांना अनेकदा वेतन, कामाचे तास, सुरक्षा साधने, विमा संरक्षण, वैद्यकीय सुविधा तसेच इतर मूलभूत हक्कांपासून वंचित राहावे लागते. अशा परिस्थितीत मोहन कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक आक्रमक आणि प्रभावीपणे काम करेल, असा विश्वास कामगारांनी व्यक्त केला आहे.

नियुक्तीनंतर जिल्ह्यातील विविध सामाजिक, राजकीय, व्यापारी आणि कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी मोहन कोल्हे यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत, कामगार चळवळीला त्यांच्या नेतृत्वातून नवी ऊर्जा मिळेल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना मोहन कोल्हे यांनी सांगितले की, "माझ्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी ही अत्यंत महत्त्वाची असून, संघटनेच्या माध्यमातून वाशिम जिल्ह्यातील प्रत्येक माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगारांच्या हक्कांसाठी मी कटिबद्ध राहीन. कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार आहे."

कामगारांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणाऱ्या या नियुक्तीकडे जिल्ह्यातील कामगार वर्ग मोठ्या अपेक्षेने पाहत असून, वाशिममध्ये संघटनेचे कार्य अधिक गतिमान होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

मोहन कोल्हे यांच्या नेतृत्वामुळे कामगार चळवळीला नवे बळ मिळणार असून, असंघटित कामगारांच्या न्यायहक्कांसाठीची लढाई अधिक प्रभावीपणे उभी राहणार आहे.

# खांदा कॉलनी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न; 1200 लाभार्थ्यांना थेट लाभ

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन पनवेल तहसील अंतर्गत पनवेल मंडळाच्या वतीने खांदा कॉलनी येथील चांगु काना ठाकूर कॉलेज येथे करण्यात आले. शासन आपल्या दारी या संकल्पनेतून नागरिकांना विविध शासकीय सेवा थेट उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक शशिकांत शेळके (आसुडगाव), दशरथ म्हात्र, जिल्हा परिषद सदस्य - प्राची अमित जाधव,



पंचायत समिती सदस्य वैशाली सावंत तसेच सरपंच देवद विनोद वाघमारे, तहसीलदार मीनल भोसले भामरे, नायब तहसीलदार राजश्री जोगी, पोलिस पाटील जनार्दन पाटील, आदई पोलिस पाटील कैलास गुरुडे, माजी पंचायत समिती सदस्य ज्ञानेश्वर बडे व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांना "जिवंत सातबारा" मोहिमेंतर्गत लाभ, दिव्यांग लाभार्थ्यांसाठी संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत पेन्शन सुरू, एसआयआर मॅपिंगद्वारे मतदारांचे मॅपिंग, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी जातीचे दाखले वितरण, विद्यार्थ्यांना डोमेसाईल, उत्पन्न व इतर दाखले तात्काळ उपलब्ध, मोठ्या प्रमाणावर आधार कार्ड अपडेट सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन करताना शिबिराच्या उपयुक्ततेवर भर दिला. पनवेल मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महाराजस्व समाधान शिबिराचे सुयोग्य नियोजन व अंमलबजावणी बद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले.

# निफाड इंग्लिश स्कूलमध्ये अमन बाळू सानप प्रथम

**दैनिक युवक आधार**


**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत असणाऱ्या माध्यमिक विभागाचा निकाल घोषित झाला असून निफाड इंग्लिश स्कूलचा निकाल ७०.९६ % लागला आहे. खालील प्रमाणे

**प्रथम पाच क्रमांक**

१)सानप अमन बाळू ८७.८० %

२).निऱ्हाळी शाहू सचिन ८५.२० %

३).शेख जिनत इकबाल ८१.४० %



४)बागडे ओमाक्षी शेखर ८० %


५) साटोटे सोनल संजय ७६.२० %

याप्रमाणे लागला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.प्रकाशजी वैशंपायन , उपाध्यक्ष मा.प्रभाकर कुलकर्णी, सेक्रेटरी हेमंत बरकले स्कूल कमिटी चेअरमन अँड.प्रविण ठाकरे ग.कौ. सदस्य व सरस्वती विद्यालयाचे चेअरमन मा.नंदलालजी चोरडीया ,सौ.ज्योती बागडे, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी तसेच सर्व संस्था व शाळा पदाधिकारी यांनी सर्व विद्यार्थिनींचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले

# नागपुरात अमली पदार्थ सेवन करून वाहन चालविणाऱ्यावर पोलिसांची कारवाई; ड्रग टेस्टमध्ये AMP पॉझिटिव्ह

**दैनिक युवक आधार**

**जोशना करवाडे विदर्भ विभाग संपादका :** नागपूर शहर पोलिसांकडून अमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध विशेष कारवाई मोहीम सुरू असून या मोहिमेत एक वाहनचालक पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १० मे २०२६ रोजी रात्री सुमारे ८:२० वाजताच्या सुमारास हॉटेल प्राईड चौक, सोनेगाव परिसरात वाहतूक तपासणीदरम्यान संबंधित वाहनचालक संशयास्पदरीत्या वाहन चालविताना आढळून आला. वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहन थांबवून चौकशी केली असता तो सार्वजनिक रस्त्यावर धोकादायक पद्धतीने वाहन चालवत असल्याचे निदर्शनास आले.

यानंतर ड्रग टेस्टिंग ॲनालायझर मशीनद्वारे करण्यात आलेल्या प्राथमिक तपासणीत संबंधित चालकाची AMP (Amphetamine) या अमली पदार्थासाठी चाचणी पॉझिटिव्ह आली.

या प्रकरणी संबंधित वाहनचालकाविरुद्ध सोनेगाव पोलीस ठाण्यात अप. क्र. ९०/२०२६ अन्वये NDPS कायदा कलम २७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधिताची सविस्तर वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून पुढील तपास सोनेगाव पोलीस करीत आहेत.

नागपूर शहर पोलिसांनी नागरिकांना अमली पदार्थ किंवा औषधांच्या प्रभावाखाली वाहन चालवू नये, असे आवाहन करत अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.

# अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने नेले पळवून

**दैनिक युवक आधार**

**पनवेल , वार्ताहर** : एका 16 वर्षीय 10 महिने वयाच्या अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेल्याची घटना पनवेल शहरात घडली असून याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.स्वाती श्रीविलास निर्मल (16 वर्षे 10 महिने), उंची 5 फुट 3 इंच, रंग गोरा, चेहरा गोल, बांधा सडपातळ, केस काळे, नाक सरळ,



गालावर डाव्या बाजूला तिळ, अंगात चॉकलेटी रंगाचा कुर्ता व पायजमा घातलेला आहे. तसेच पायात काळ्या-गुलाबी रंगाची चप्पल आहे. तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे.

या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा स.पो.नि. प्रवीण फडतरे यांच्याशी संपर्क साधावा.

# अंजनगाव सुर्जी तालुक्यात हिरव्यागार सजीव वृक्षांची कत्तल

## कार्यवाहीची जबाबदारी कोणाची नगर परिषद की तहसील ?

**दैनिक युवक आधार**

**संतोषराव घोडेराव / तालुका प्रतिनिधी** : अंजनगाव सुर्जी,तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून जुन्या, डेरेदार वृक्षांची बेकायदेशीर कत्तल सुरू आहे. शेतातील पिकांना माकडांपासून त्रास होत असल्याचे कारण पुढे करत काही शेतकरी दलालांमार्फत धुऱ्यांवरील महाकाय वृक्ष तोडत आहेत. यामुळे परिसरातील पर्यावरणाचा समतोल बिघडला असून वनविभागाच्या भूमिकेवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, रात्रीच्या वेळी किंवा शासकीय सुट्टीच्या दिवशी जाणीवपूर्वक वृक्षतोड केली जाते. तस्करांना यामुळे मोकळे रान मिळाले आहे. एकीकडे शासन वृक्षलागवडीवर भर देत असताना दुसरीकडे ४०-५० वर्ष जुनी झाडे तोडली जात असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

या बेसुमार वृक्षतोडीचे दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. तालुक्यात पावसाचे प्रमाण घटले असून यावर्षी तापमानाने ४५° अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला होता. शेतशिवारातील सावली देणारी झाडे नष्ट झाल्याने उन्हाचा तडाखा वाढला आहे. बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील दुतर्फा रस्त्यांवरील झाडांचीही कत्तल सुरू असल्याचे समोर आले आहे.





गेल्या काही वर्षापासून वृक्षतोडीमध्ये अंजनगाव सूर्जी जिल्ह्यात अग्रस्थानावर जात असल्याचे दिसून येत आहे.याचे कारण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वाढत असलेले रहिवासी अतिक्रमण , अवैध प्लोटिंग हे असल्याचे नागरिक सांगतात.

**वृक्षतोडीवर काय गुन्हा दाखल होऊ शकतो नियम काय सांगतात ?**

महाराष्ट्रात विना परवानगी वृक्षतोड केली तर तो गंभीर गुन्हा आहे. मुख्यतः महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, 1964 आणि झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 अंतर्गत कारवाई होते.

1. कोणते गुन्हे दाखल होऊ शकतात:

विनापरवानगी वृक्षतोड/छाटणी : खाजगी जागेत असले तरी अनेक झाडांसाठी वृक्ष अधिकाऱ्याची म्हणजे Range Forest Officer किंवा त्याहून वरिष्ठ अधिकाऱ्याची परवानगी लागते. परवानगी न घेता तोडल्यास गुन्हा दाखल होतो.

सूट नसलेल्या झाडांची तोड : शासनाने ज्या झाडांना तोड व वाहतुकीसाठी सूट दिली नाही, अशी झाडे तोडणे कायद्याने बेकायदेशीर आहे.

ग्रामपंचायत हद्दीतील तोड : ग्रामपंचायत हद्दीत परवानगी न घेता झाड तोडल्यास ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ नुसार कारवाई होते.

2. दंड आणि शिक्षा :

झाड छाटणी : विनापरवानगी छाटणी केल्यास ₹2,000 ते ₹25,000 दंड.

संपूर्ण वृक्ष तोडणे : ₹25,000 ते ₹1,00,000 पर्यंत दंड.

वरील दंड न भरल्यास घरपट्टीवर बोजा चढवला जातो.

ग्रामपंचायत स्तरावर झाडाच्या प्रजाती व नुकसानीप्रमाणे दंड आकारला जातो.दंड न भरल्यास कायदेशीर कारवाई होते.

3. परवानगी कोण देते :

"वृक्ष अधिकारी" म्हणजे वनक्षेत्रपाल दर्जाचा किंवा त्याहून वरिष्ठ अधिकारी. वनपाल किंवा कनिष्ठ अधिकारी निर्णय घेऊ शकत नाहीत. नदी/नाल्यापासून 30 मीटर अंतरावरील झाडांसाठी फक्त वृक्ष अधिकाऱ्यांनाच अधिकार आहेत.

4. तक्रार कुठे करावी :

१.संबंधित ग्रामपंचायतीमध्ये २.वन विभागाच्या कार्यालयात

वनविभाग आणि बांधकाम विभागाने तातडीने संयुक्त कारवाई करून वृक्षतोड थांबवावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे. वेळीच उपाययोजना न केल्यास अंजनगाव सुर्जी तालुक्याला भविष्यात गंभीर पर्यावरणीय संकटाला सामोरे जावे लागेल, अशी भीती व्यक्त होत आहे.

Range Forest Officer (RFO) अंजनगाव सुर्जि श्री.दिनेश वाळके यांचे म्हणणे काय ?

होत असलेली वृक्षतोड ही मुख्य रस्त्याच्या दुतर्फा होत आहे ज्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.सोबतच अशा लोकांवर मोठी कार्यवाही करून गुन्हे दाखल केल्यास वृक्षतोडीस आळा बसू शकतो.

# एका शेतकऱ्याच्या जिद्दीतून साकारलेलं रायगडचं वैभव: 'शिवगंगा वॉटर पार्क'ची यशोगाथा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** केवळ व्यावसायिक दृष्टीकोन न ठेवता, निसर्ग आणि भक्तीचा वारसा जपत एका सामान्य शेतकरी कुटुंबाने उभ्या केलेल्या 'शिवगंगा वॉटर पार्क अँड रिसॉर्ट'ने आज रायगड जिल्ह्याची शान वाढवली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेतून आणि एका वडिलांच्या अढळ विश्वासामुळे उभ्या राहिलेल्या या प्रकल्पाने आज यशाचे शिखर गाठले असून, पर्यटनासोबतच सामाजिक बांधिलकीचा एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.




शिवगंगा वॉटर पार्कची ही कथा संघर्षातून यशाकडे जाणारी आहे. या जागेची सुरुवात एका छोट्या शिवमंदिराने आणि शेतीने झाली होती. आपल्या शेतातील आमराई आणि निसर्ग जपून पर्यटकांना शहराच्या गजबजाटापासून दूर काहीतरी उत्तम मिळावे, या विचारातून वडिलांनी या पार्कची संकल्पना मांडली. २०१३ मध्ये जेव्हा या प्रकल्पाची पायाभरणी झाली, तेव्हा अनेक अडचणी आल्या आणि कुटुंबाचा विरोधही झाला. मात्र, वडिलांच्या अढळ विश्वासामुळे हे धाडस करण्यात आले. सुरुवातीची तीन वर्षे व्यवसायाविना अत्यंत कठीण गेली, पण जिद्द न सोडल्यामुळे आज हे भव्य रिसॉर्ट पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनले आहे. हे पार्क पूर्णपणे शाकाहारी असून, इथे येणाऱ्या प्रत्येकाला घरगुती जेवण आणि आपुलकीची सेवा मिळते. 'शिवगंगा' हे नाव शिवरायांच्या भूमीचा सन्मान करण्यासाठी ठेवण्यात आले आहे. येथे माफक दरात अनलिमिटेड नाश्ता, जेवण आणि विविध वॉटर गेम्सचा आनंद घेता येतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी येथे विशेष सोय करण्यात आली आहे, ज्यामुळे हे एक उत्तम कौटुंबिक सहलीचे ठिकाण ठरले आहे.

गेल्या २० वर्षांपासून कार्यरत असलेले दिनेश शुक्ला यांनी व्यवसायासोबतच सामाजिक कार्याचा मोठा वारसा जपला आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून ते नेहमीच गोरगरिबांना मदतीचा हात देत असतात. कोरोनाच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी गरजूंना हजारो किराणा किटचे वाटप केले होते. केवळ एवढेच नाही, तर परिसरातील नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आणि मोफत औषधोपचार यांसारखे उपक्रम शिवगंगा वॉटर पार्कच्या वतीने सातत्याने राबविले जातात. निसर्ग, भक्ती आणि कौटुंबिक आनंदाचा संगम असलेल्या या शिवगंगा वॉटर पार्कला एकदा अवश्य भेट देऊन शिवरायांच्या या पावन भूमीत शिवशंकराचा आशिर्वाद घेऊन तेथील परिसराच्या निसर्गाचा मनसोक्त आनंद घ्यावा, असे आवाहन दिनेश शुक्ला यांनी केले आहे.

# काशीबाई अग्रवाल विद्यालयाचा ९७.२२% निकाल, उज्वल यशाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी :** येवदा येथील काशीबाई अग्रवाल विद्यालय व कै. भाऊसाहेब देशमुख उच्च माध्यमिक विद्यालयाने एस.एस.सी. बोर्ड परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घवघवीत यश संपादन करत आपली उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९७.२२ टक्के लागला आहे.

ग्रामीण भागातील नावलौकिक प्राप्त व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे विद्यालय म्हणून ओळख असलेल्या काशीबाई अग्रवाल विद्यालयाने यंदाही दहावीच्या निकालात बाजी मारली. सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, पालक व शाळा व्यवस्थापनाचे सहकार्य




यामुळे विद्यार्थ्यांनी हे यश प्राप्त केल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

कु. शुभश्री गोपाळ मोहोड हिने ९४.६०% गुण मिळवत विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला. भावेश प्रमोदराव टिकर याने ९३.२०% गुणांसह द्वितीय तर रितेश विलासराव ठाकरे व कृष्णा चंद्रशेखर जांभळे यांनी प्रत्येकी ९२% गुण मिळवून तृतीय क्रमांक संयुक्तपणे मिळवला.

इयत्ता १० ब मधून नैतिक संजय तायडे याने ८९.२०%, वैभव दिनेश मुंडाले याने ८०.६०% तर अनुष्का प्रदीप वानखडे हिने ८०.४०% गुण मिळवले.

**उर्दू माध्यमाचीही चमकदार कामगिरी**

उर्दू माध्यमातून जवेरिया फातेमा खालिद नदीम हिने ९२.४०%, हुमेरा फिरदोस नेहमत खान हिने ८५% तर हुदा सादिया राझिक अहमद हिने ८३.२०% गुण मिळवून यश संपादन केले.

विद्यालयातील एकूण ३५ विद्यार्थ्यांना ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले असून अनेक विद्यार्थ्यांनी विविध विषयात प्राविण्यश्रेणी प्राप्त केली आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या घवघवीत यशाबद्दल येवदा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णासाहेब ठाकूर, सचिव हर्षराज देशमुख, कोषाध्यक्ष प्रदीपराव देशमुख, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य प्रदीप निळकंठ देशमुख, उपप्राचार्य मोहम्मद अतहर, पर्यवेक्षक प्रा. किशोर थोटे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, मार्गदर्शक शिक्षक, मुख्याध्यापक व शाळा प्रशासनाला दिले.

# भारतातील पाणीसंकट आणि टेक कंपन्यांची वाढती तहान

## Amazon, Google, Microsoft यांच्या डेटा सेंटरमुळे निर्माण होणारे प्रश्न

आज जग कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), क्लाऊड स्टोरेज आणि डिजिटल सेवांच्या युगात वेगाने पुढे जात आहे. पण या डिजिटल क्रांतीची एक गंभीर किंमत पर्यावरण आणि पाणीस्रोतांना मोजावी लागत आहे. विशेषतः Amazon, Google आणि Microsoft सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांची डेटा सेंटर आणि AI प्रकल्पांसाठी लागणारी प्रचंड पाण्याची गरज आता जगभर चिंतेचा विषय बनली आहे.

या कंपन्यांचे डेटा सेंटर मोठ्या प्रमाणावर पाणी वापरतात आणि त्यामुळे स्थानिक जलस्रोतांवर ताण वाढू शकतो, हे अनेक अहवालांतून स्पष्ट झाले आहे.

**डेटा सेंटरला एवढे पाणी का लागते?**

AI आणि क्लाऊड सेवा चालवण्यासाठी हजारो सर्व्हर २४ तास कार्यरत असतात. हे सर्व्हर प्रचंड उष्णता निर्माण करतात. त्यांना थंड ठेवण्यासाठी "Cooling Systems" वापरले जातात आणि त्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर होतो.

Nature या वैज्ञानिक जर्नलमधील संशोधनानुसार, जगभरातील डेटा सेंटरमध्ये पाण्याचा वापर झपाट्याने वाढत आहे.

Google, Microsoft आणि Amazon किती पाणी वापरतात?

Google च्या पर्यावरण अहवालानुसार, कंपनीने २०२४ मध्ये सुमारे ८.१ अब्ज गॅलन पाणी वापरल्याचे नमूद केले आहे. कंपनीचे बहुतांश पाणी डेटा सेंटर थंड ठेवण्यासाठी वापरले जाते.

मायक्रोसॉफ्ट ने AI इन्फ्रास्ट्रक्चर वाढल्यामुळे पाण्याच्या वापरात मोठी वाढ झाल्याचे मान्य केले आहे. कंपनीचा जलवापर एका वर्षात तब्बल 34% ने वाढल्याचे अहवालात नमूद आहे. अमेझॉन वेब सर्विसेस (AWS) जगातील सर्वात मोठ्या क्लाऊड सेवा पुरवठादारांपैकी एक आहे. कंपनीने एकूण जलवापराचे संपूर्ण आकडे सार्वजनिक केले नसले तरी डेटा सेंटरसाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागते हे मान्य केले आहे.

भारतात काय परिस्थिती आहे?

भारत आधीच पाणीसंकटाचा सामना करत आहे. अनेक राज्यांमध्ये भूजल पातळी घटत आहे. अशा परिस्थितीत मोठ्या AI आणि डेटा सेंटर प्रकल्पांसाठी पाणी वापर वाढल्यास भविष्यात गंभीर संघर्ष निर्माण होऊ शकतो.

वॉशिंगटन पोस्ट च्या अहवालानुसार, भारतात AI आणि डेटा सेंटर गुंतवणूक झपाट्याने वाढत आहे. विशेषतः हैदराबाद, विशाखापट्टणम आणि इतर शहरांमध्ये मोठे डेटा सेंटर प्रकल्प उभारले जात आहेत.

अनेक देशांमध्ये स्थानिक नागरिकांनी डेटा सेंटर प्रकल्पांना विरोध सुरू केला आहे. कारण:

भूजलाचा वाढता वापर, शेती आणि नागरिकांसाठी पाण्याची कमतरता, विजेचा प्रचंड वापर, पर्यावरणीय परिणाम इ. आहेत. Reuters च्या अहवालानुसार, गुंतवणूकदार आणि पर्यावरणवादी संस्था आता Amazon, Google आणि Microsoft कडून "साइटनिहाय पाण्याचा वापर" सार्वजनिक करण्याची मागणी करत आहेत.

या कंपन्या म्हणतात की:

त्या "Water Positive" होण्याचा प्रयत्न करत आहेत.वापरलेल्या पाण्यापेक्षा अधिक पाणी पुनर्भरण करण्याचे उद्दिष्ट आहे. नवीन Cooling Technology मुळे पाणी कमी लागते. पण पर्यावरण अभ्यासकांचे म्हणणे आहे की कंपन्यांनी अजूनही संपूर्ण पारदर्शकता दाखवलेली नाही.

त्यांच्या AI आणि डेटा सेंटरमुळे प्रचंड पाण्याचा वापर होत आहे, हे दस्तऐवज आणि अहवालांतून स्पष्ट दिसते. भारतासारख्या पाणीसंकटग्रस्त देशात हा मुद्दा भविष्यात अत्यंत गंभीर ठरू शकतो. डिजिटल प्रगती आवश्यक आहे; पण त्यासाठी सामान्य नागरिकांचे पाणी, शेती आणि पर्यावरण धोक्यात येणार असेल तर सरकार, नागरिक आणि कंपन्यांनी मिळून पारदर्शक आणि शाश्वत धोरणे तयार करणे गरजेचे आहे.

**लेखक**
**रोशन लाला खोब्रागडे**

# एसएससी परीक्षेत विशेष प्राविण्यासह नर्मदा सरकाटे हिचे यश

## गणित विषयात मिळविले १०० पैकी १०० गुण

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव /यवतमाळ** : महागाव तालुक्यातील आंबोडा येथील रहिवासी तथा सकाळ वृत्तपत्राचे ग्रामीण प्रतिनिधी जगदीश सरकाटे यांची कन्या कु. नर्मदा लक्ष्मीकांत सरकाटे हिने इयत्ता दहावीच्या एसएससी परीक्षेत विशेष प्राविण्यासह उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



मातोश्री इंग्लिश मीडियम स्कूल, महागाव येथील विद्यार्थिनी असलेल्या नर्मदाने ९४.४० टक्के गुण मिळवत गणित विषयात तब्बल १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. ट्युशन अथवा कोचिंग क्लासेसचा आधार न घेता स्वअध्ययन व सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तिने हे यश मिळविले आहे.नर्मदाच्या या यशाबद्दल महागाव तालुका मराठा सेवा संघाचे अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष उदय नरवाडे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी नर्मदाच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.तिच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पत्रकारांच्या सोबतीने कर्करोगाशी लढण्याची प्रतिज्ञा; ६० जणांची तपासणी; पत्रकार प्रेस क्लब' आणि 'कॅन्सर केअर फाउंडेशन'चा एक कौतुकास्पद उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** "पत्रकारांच्या सोबतीने, आपण कर्करोगाविरुद्धचा लढा नक्कीच जिंकू!" या प्रेरणादायी संकल्पासह, आज (रविवार) 'पत्रकार प्रेस क्लब'च्या आवारात आयोजित करण्यात आलेला आरोग्य आणि कर्करोग तपासणी शिबिर हा जनजागृती आणि समाजसेवेचा एक उत्कृष्ट नमुना ठरला. सकाळी १०:०० ते दुपारी ४:०० या वेळेत आयोजित या शिबिरात ६० हून अधिक पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि आरोग्य तपासणी सेवांचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या भाषणात त्यांनी नमूद केले की, पत्रकार हे समाजाचा आरसा असतात आणि त्यांचे आरोग्य सुस्थितीत राखणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा शिबिरांमुळे केवळ रोगांचे वेळीच निदान होण्यास मदत होत नाही, तर समाजात आरोग्याविषयी अधिक जागृती निर्माण होण्यासही चालना मिळते. प्रशासनाकडून भविष्यातही अशा जनहितकारी उपक्रमांना पूर्ण सहकार्य दिले जाईल, असे आश्वासन त्यांनी उपस्थितांना दिले.




या प्रसंगी 'कॅन्सर केअर फाउंडेशन'चे शाकीर रजा खान आणि अब्दुल पाशा; 'पत्रकार प्रेस क्लब'चे अध्यक्ष प्रदीप मैत्रा; तसेच ब्रह्मशंकर त्रिपाठी, सनी शेंडे आणि रणजित देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिबिरादरम्यान, तज्ज्ञ डॉक्टरांच्या एका पथकाने विविध तपासण्या केल्या आणि उपस्थितांना तज्ज्ञ मार्गदर्शन पुरवले. सेवा देणाऱ्या वैद्यकीय पथकात डॉ. प्रतीक विश्वकर्मा, डॉ. प्रशांत धोके, डॉ. दीप्ती दासवाणी, डॉ. आमोद, डॉ. अक्षदा, डॉ. वैभव साखरे, डॉ. प्रज्ञा मोदक, डॉ. जनक थडाणी आणि डॉ. मोहम्मद नुक्मान यांचा समावेश होता. लीना तेलंग, अस्मा सिंग, प्रांजल कटारे आणि सूरज डांगे यांचा समावेश असलेल्या सहाय्यक पथकाने या कार्यक्रमाच्या यशात मोलाचे योगदान दिले.

रक्त तपासण्या पार पाडण्यात 'साईनाथ ब्लड सेंटर'चे रजत उके आणि रूपाली साहू यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. भूपेंद्र गणवीर, मंगेश व्यवहारे, प्रकाश रंगारी, दिलीप तिखिले आणि श्यामकांत पात्रिकर यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकारांनी या शिबिरात सहभाग घेतला आणि या उपक्रमाच्या यशाला हातभार लावला. कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी, आयोजकांनी सर्व डॉक्टर, सहकारी आणि सहभागींप्रती कृतज्ञता व्यक्त केली; तसेच भविष्यातही अशाच प्रकारची लोककल्याणकारी शिबिरे आयोजित करण्याची ग्वाही दिली.

# अकोल्यात ३१ मे रोजी पाटील समाज वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन!!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी :** पाटील वेल्फेअर फाऊंडेशन, मराठा मंडळ अकोला आणि छत्रपती शिवशंभू प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी रविवार, ३१ मे २०२६ रोजी भव्य 'पाटील समाज वधू-वर परिचय मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा अकोला येथील मराठा मंगल कार्यालय येथे संपन्न होईल.आजच्या धावपळीच्या युगात वधू-वरांचा शोध घेणे पालकांसाठी आव्हानात्मक ठरत आहे. हीच गरज ओळखून पाटील समाजातील उपवर युवक-युवतींना आणि त्यांच्या पालकांना एकाच व्यासपीठावर आणण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे रविवार, ३१ मे २०२६मराठा मंगल कार्यालय, अकोला आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यात उपवर वधू-वरांना स्वतःचा परिचय देण्याची संधी. आणिपालक संवाद, विविध क्षेत्रांतील स्थळांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध. करून देण्यात आली आहे.




मेळाव्यासाठी नाव नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून "समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींना योग्य जोडीदार मिळावा आणि सामाजिक बांधिलकी जोपासली जावी, या भावनेतून हा उपक्रम राबवण्यात येत आहे. समाजातील जास्तीत जास्त बांधवांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा," असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी पाटील वेल्फेअर फाऊंडेशन, मराठा मंडळ आणि शिवशंभू प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी आयोजकांशी संपर्क साधावा.

# आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते पाबळवाडीत नळजोडणी योजनेचे लोकार्पण

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड शहरातील प्रभाग क्रमांक १३ मधील पाबळवाडी येथे नगर परिषदेच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नळजोडणीचे लोकार्पण रविवारी (दि. १०) आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते व नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



या योजनेमुळे पाबळवाडी परिसरातील नागरिकांना अनेक वर्षांपासून भेडसावणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येतून कायमस्वरूपी मुक्ती मिळाली आहे.

नगर परिषद निवडणुकीपूर्वी आमदार अब्दुल सत्तार यांनी पाबळवाडी परिसरातील नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठ्याचे आश्वासन दिले होते. हे आश्वासन पूर्णत्वास आल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. लोकार्पण प्रसंगी बोलताना आमदार सत्तार म्हणाले की, "पाबळवाडीसारख्या वाडी-वस्तीपर्यंत नळाद्वारे शुद्ध पाणी पोहोचविणे ही केवळ एक सुविधा नसून नागरिकांचे जीवनमान उंचावण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. जनतेने दाखविलेला विश्वास हीच आमच्या कामाची प्रेरणा आहे."

नगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी यावेळी नागरिकांना दिलासा देताना सांगितले की, "वाढत्या उन्हाची तीव्रता पाहता, ज्या विस्तारित वस्त्यांमध्ये अद्याप नळ योजना पोहोचलेली नाही, तिथे नगर परिषदेमार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जाईल.

नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून प्रशासनाला सहकार्य करावे."

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, नगरसेवक अकिल वसईकर, शेख इम्रान (गुड्डू), फहिम पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी स्थानिक नागरिकांच्या वतीने आमदार अब्दुल सत्तार आणि नगराध्यक्ष अब्दुल समीर यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास इंदरसिंग दुधे, भाऊराव दुधे, मोतीराम दुधे, शांताराम दुधे, तुकाराम दुधे, रघुनाथ दुधे, कारभारी दुधे, सुरेश दुधे, सतीश दुधे, त्र्यंबक दुधे यांच्यासह पाबळवाडीतील महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जाहीर नोटीस

**महाराष्ट्र शासन**

**अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय**

**जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१**

**दुरध्वनी क्र.:- ०२२- २२६१००१३** **ई-मेल: addcollmumbai@gmail.com**

---

**जाहिर नोटीस (अपील क्र. १३/२०२५)**

**हेमांग प्रमोद केळुसकर** **अपिलार्थी**
**विरुध्द**
सहायक आयुक्त जी/दक्षिण विभाग व इतर ०३. **उत्तरार्थी**
**प्रति,**
१. अध्यक्ष/सचिव
शिवशक्तीनगर सह. गृह. संस्था, ना.म. जोशी मार्ग,
न्यु प्रभादेवी रोड,
प्रभादेवी मुंबई-४०० ०१३.- **- (उत्तरार्थी क्र. २)**
२. शांताराम बाळू नाईक
शिवशक्तीनगर, पत्राशेड शेजारी, ना.म. जोशी मार्ग,
न्यु प्रभादेवी रोड, प्रभादेवी मुंबई-४०० ०२५. **-(उत्तरार्थी क्र. ३)**
३. विनोद बापू केळुसकर
शिवशक्ती नगर, पत्राशेड शेजारी, ना.म.जोशी मार्ग, न्यु प्रभादेवी रोड,
प्रभादेवी मुंबई-४०० ०२५. **-(उत्तरार्थी क्र. ४)**

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे शिवशक्तीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट-२ मधील अ.क्र. १ वर पात्र करणेसाठी अपील अर्ज दाखल केला आहे. अपिलार्थी यांनी प्रश्नांकित झोपडी / दावा केलेली झोपडी आपणांकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०३ व ०४ केले आहे. तसेच अपिलार्थी यांनी संस्था यांना उत्तरार्थी क्र.०२ केले आहे. प्रकरणी दि. २५.०३.२०२६ रोजीचे सुनावणी मध्ये आपण गैरहजर असल्याने मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०२, ०३, व ०४ असून दि. १३/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

**सहाय्यक महसूल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर**

# जाहीर नोटीस

**महाराष्ट्र शासन**

**अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय**

**जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१**

**दुरध्वनी क्र.:- ०२२- २२६१००१३** **ई-मेल: addcollmumbai@gmail.com**

---

**जाहिर नोटीस (अपील क्र. १४/२०२५)**

**सुरज कुमार पाल** **अपिलार्थी**
**विरुध्द**
सहायक आयुक्त जी/दक्षिण विभाग व इतर ०३. **उत्तरार्थी**
**प्रति,**
१. अध्यक्ष/सचिव
शिवशक्तीनगर सह. गृह. संस्था, ना.म. जोशी मार्ग,
न्यु प्रभादेवी रोड, प्रभादेवी मुंबई-४०० ०१३. **- (उत्तरार्थी क्र. २)**
२. उदय चंद्रकांत चेऊलकर
शिवशक्ती नगर, पत्राशेड शेजारी, ना.म.जोशी मार्ग,
न्यु प्रभादेवी रोड, प्रभोदवी मुंबई-४०० ०२५. **-(उत्तरार्थी क्र. ३)**
३. सुलोचना हरिश्चंद्र
शिवशक्ती नगर, पत्राशेड शेजारी, ना.म. जोशी मार्ग,
न्यू प्रभादेवी रोड, प्रभादेवी मुंबई-४०००२५. **-(उत्तरार्थी क्र. ४)**

सदर जाहिर नोटीसी द्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलाथी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे शिवशक्तीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट-२ मधील अ.क्र.१२ वर पात्र करणेसाठी अपील अर्ज दाखल केला आहे.

अपिलार्थी यांनी प्रश्नांकित झोपडी / दावा केलेली झोपडी आपणांकडून खरेदी केल्याचे दिसून येत असल्याने सदर अपील प्रकरणात आपणांस उत्तरार्थी क्र. ०३ व ०४ केले आहे. तसेच अपिलार्थी यांनी संस्था यांना उत्तरार्थी क्र. ०२ केले आहे. प्रकरणी दि. २५.०३.२०२६ रोजीचे सुनावणी मध्ये आपण गैरहजर असल्याने मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०२ ०३, व ०४ असून दि. १३/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण उपस्थित / हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

**सहाय्यक महसूल अधिकारी**
**अपर जिल्हाधिकारी कार्यालय,मुंबई शहर**

# आकाशात उजळला महामानवाच्या तेजाचा प्रकाश

## २००० ड्रोनच्या भव्य रोषणाईतून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- मयूर प्रकाश धुरी**

दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथीलनिळ्या आकाशात झेपावलेल्या हजारो ड्रोननी "जय भीम", संविधानाची प्रतिमा, अशोक चक्र आणि बाबासाहेबांचा भव्य चेहरा साकारत उपस्थितांची मने जिंकली. या अद्भुत ड्रोन शोने संपूर्ण परिसर देशभक्ती, अभिमान आणि प्रेरणेच्या भावनेने भारावून गेला.







कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक, युवक आणि आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते.ड्रोनच्या प्रकाशातून साकारलेली ही मानवंदना केवळ एक शो नव्हती, तर महामानवांच्या विचारांना दिलेला आधुनिक सलाम होता."शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा संदेश पुन्हा एकदा आकाशातून झळकला आणि प्रत्येकाच्या मनात बाबासाहेबांविषयीचा अभिमान अधिक दृढ झाला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सिल्लोडमध्ये २७७ विद्यार्थ्यांना ‘RTE’ प्रवेश पत्रांचे उत्साहात वाटप



**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड येथील पंचायत समिती शिक्षण विभागामार्फत शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (RTE) प्रवेश प्रक्रियेनुसार सिल्लोड तालुक्यातील २७७ पात्र विद्यार्थ्यांना मोफत शाळा प्रवेश प्रमाणपत्र वाटप सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. पंचायत समिती सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांच्या हस्ते या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी भाजपा प्रदेश चिटणीस तथा सिल्लोड-सोयगाव विधानसभा नेते सुरेश बनकर व भाजपा ज्येष्ठ नेते दिलीप काका दानेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमामुळे तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणाचा मार्ग आता कायदेशीररीत्या मोकळा झाला आहे.

या सोहळ्याला माजी पंचायत समिती सदस्य अनिल खरात, पंचायत समिती सदस्य नारायण खोमणे, पंचायत समिती सदस्य सुदाम बन्सोड, भाजपा सिल्लोड शहर मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लू, भाजपा भवन मंडळ तालुकाध्यक्ष एकनाथ हिवाळे, भाजपा शिवना मंडळ तालुकाध्यक्ष आत्माराम पाडाळे, भाजयुमो तालुकाध्यक्ष विजय वानखेडे, शिवना मंडळ उपाध्यक्ष विष्णू गव्हाणे, माजी सरपंच राजेंद्र दांडगे, वामन गवळे, साहेबराव शेजुळ यांची विशेष उपस्थिती होती. ही प्रवेश प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी शिक्षण विस्तार अधिकारी फुसे सर, मोरे सर, शिंदे सर, गाडेकर सर, गिराम सर, वराडे सर यांसह शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. तालुक्यातील नामांकित खाजगी शाळांमध्ये मोफत प्रवेशाचे प्रमाणपत्र मिळाल्याने उपस्थित पालक आणि विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक, विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते.

# मान्सूनपूर्व तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला सविस्तर आढावा

## सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम कराव,जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** आगामी पावसाळ्यात जिल्ह्यात कोणतीही दुर्घटना होऊ नये, यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी आतापासूनच सतर्क राहून समन्वयाने पूर्वतयारी करावी. जिल्ह्याचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा चोख असावा आणि आपत्कालीन स्थितीत तत्काळ मदतीसाठी 'आपदा मित्रां'ची संख्या वाढवावी, असे निर्देश ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक २०२६' समिती सभागृहात संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते.



बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी बोलताना ते म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळ्यापूर्वी जिल्ह्यातील सर्व धोकादायक पूल, साकव आणि जुन्या इमारतींचे ऑडिट करावे. जलसंपदा विभागाने धरणांची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक अहवाल सादर करावा. राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्सून काळात दरडी कोसळण्याच्या घटना लक्षात घेऊन प्रमुख घाटांमध्ये जेसीबी, पोकलेन आणि डंपरची कायमस्वरूपी व्यवस्था करावी.

डॉ.पांचाळ यांनी आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणांची गतिशीलता तपासण्यासाठी अग्निशमन दल, पोलीस आणि आरोग्य विभागाने प्रत्येक तालुक्यात रंगीत तालीम घ्यावी. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागाने औषध साठा आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत अशा सूचना देवून आपत्ती निवारणासाठी आवश्यक साधनसामुग्रीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून अनुदान उपलब्ध करून दिले जाईल,असे स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी यावेळी दरडप्रवण गावे, पूरप्रवण क्षेत्रे, नदीतील गाळ काढणे, औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षा आणि शोध-बचाव साहित्याची उपलब्धता यांचा सविस्तर आढावा घेतला.निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे आपत्ती व्यवस्थापन आराखड्याची माहिती दिली. सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना आपापल्या स्तरावर नियंत्रण कक्ष (Control Rooms) तातडीने स्थापन करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा पर्यावरणीय दृष्टिकोन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** समुद्रातील प्लास्टिक कचरा व पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व द ओशन क्लीनअप ने एक करार केल्याने समुद्रातील प्लास्टिक कचरा कमी होणार आहे. दरवर्षी अरबी समुद्रात प्रवेश करणाऱ्या आणि किनारी परिसंस्था व जैवविविधतेला धोका निर्माण करणाऱ्या ५० लाख किलो प्लास्टिकचे उच्चाटन होणार आहे.

या पार्श्वभूमीवर ट्रॉम्बे क्रीक आणि मालाड क्रीक येथील कार्यवाहीसाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून परवानग्या मिळवण्यात आल्या. या उपाययोजनांची अंमलबजावणी 'प्लास्टिक फिशर' आणि 'युनायटेड वे मुंबई' यांच्या सहकार्याने केली जाणार आहे. जगातील महासागरांना प्लास्टिक प्रदूषणापासून मुक्त करण्यासाठी समर्पित असलेल्या 'द ओशन क्लीनअप' या जागतिक गैर-लाभकारी संस्थेने, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासोबत (MPCB) सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे.

द ओशन क्लीनअप'चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, बोयान स्लाट म्हणाले: “समुद्रातील प्लास्टिक प्रदूषणाची समस्या सोडवण्यासाठी मूळ स्रोतावरच कृती करणे आवश्यक आहे. सिद्धेश आर. कदम व नबील ताओवाती म्हणाले: “जल व्यवस्थापन, चक्रीय अर्थव्यवस्था पद्धती आणि नाविन्यपूर्ण कचरा व्यवस्थापन उपायांमध्ये जागतिक स्तरावर अग्रेसर असलेल्या नेदरलँड्सला, हे डच तंत्रज्ञान या महत्त्वपूर्ण उपक्रमात योगदान देत असल्याचे पाहून आनंद होत आहे.

हा उपक्रम भारतातील शाश्वत कचरा व्यवस्थापनातील डचांच्या चालू असलेल्या सहभागालाही पुढे नेतो, ज्यात सामाजिक परिणाम आणि तांत्रिक नावीन्य यांचा संगम आहे.”

# एसटी कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे एका महिला प्रवाशाची विसरलेली सोन्याच्या दागिन्यांची बॅग मिळाली परत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल , (वार्ताहर) :** कळंबोली येथील बस स्थानकावर एका महिला प्रवाशाची विसरलेली सोन्याच्या दागिन्यांची बॅग एसटी कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे सुखरूप परत मिळाली आहे.कमरजहा मोहम्मद रफीक शेख या कळंबोली बस स्थानकावर आपली मौल्यवान बॅग विसरल्या होत्या. बस स्थानक नियंत्रक नितीन भारती यांना ही बॅग सापडल्यानंतर त्यांनी ती तात्काळ सुरक्षित ताब्यात घेऊन संबंधित महिलेला परत केली. नितीन भारती यांच्या या प्रामाणिकपणाची दखल घेत कळंबोली पोलीस ठाण्याचे एपीआय डफळ आणि पोलीस हवालदार हराळे यांनी त्यांचा पुष्पगुच्छ व शाल




देऊन विशेष सत्कार केला. त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ऐन उन्हाळ्यात महावितरणचा मनमानी कारभार; ८-८ तास वीज गायब, शिरसोदेकरांचा संताप अनावर !

**दैनिक युवक आधार**

**जळगाव- शिरसोदे (आनंद पवार) :** जळगाव जिल्ह्यात सध्या उष्णतेने अक्षरशः कहर केला असून तापमानाने ४४ ते ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला आहे. प्रचंड उकाड्यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असतानाच पारोळा तालुक्यातील शिरसोदे गावात महावितरण कंपनीच्या ढिसाळ नियोजनाचा फटका नागरिकांना बसत आहे. गावात वीज केबल टाकण्याचे काम सुरू असल्याने तब्बल सात ते आठ तास वीज पुरवठा खंडित केला जात असून नागरिकांची अक्षरशः जीवाची लाही लाही होत आहे.

सकाळपासून सुरू होणाऱ्या या कामामुळे दिवसभर वीज गायब राहत असल्याने घरातील पंखे, कूलर, पाण्याच्या मोटारी बंद पडत आहेत. उष्माघाताच्या झळांनी हैराण झालेल्या नागरिकांना या परिस्थितीत मोठा मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः वयोवृद्ध, महिला, आजारी रुग्ण आणि लहान बालकांचे हाल होत असून उकाड्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

मे महिन्याच्या कडक उन्हातच महावितरण कंपनीने वीज केबल टाकण्याचे काम सुरू केल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली आहे. कामाचे योग्य नियोजन न करता दीर्घकाळ वीज बंद ठेवली जात असल्याने नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर जोरदार नाराजी व्यक्त केली आहे. “ऐन उन्हाळ्यात नागरिकांना वेठीस धरण्याचा हा प्रकार असून महावितरणला जनतेच्या हालअपेष्टांशी काहीही देणेघेणे नसल्याचे दिसून येत आहे,” अशा तीव्र प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहेत.

गर्मीने हैराण झालेल्या शिरसोदेकरांचा जीव कासावीस झाला असून महावितरण प्रशासनाने तातडीने पर्यायी व्यवस्था करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# मोरेगाव येथे रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**सेलू (प्रतिनिधी) शिवाजी पवार :** मोरेगाव ते वालूर या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या निषेधार्थ मोरेगाव, साळेगाव, खेर्डा व हातनूर येथील नागरिकांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग, सेलू यांना निवेदन देण्यात आले. संबंधित रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण न झाल्यास दिनांक १९ मे २०२६ रोजी मोरेगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मोरेगाव ते वालूर या रस्त्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून रखडले असून संबंधित कंत्राटदाराने रस्ता खोदून अर्धवट अवस्थेत सोडला आहे. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे व धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या धुळीमुळे व खड्ड्यांमुळे अनेक अपघात घडून



नागरिक जखमी झाले असून वाहनधारकांना या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत धोकादायक बनले आहे.

दरम्यान, काही दिवसांत पावसाळ्याची सुरुवात होणार असतानाही काम पूर्ण झाले नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे तात्काळ रस्त्याचे काम पूर्ण करण्यात यावे, अन्यथा हातनूर, साळेगाव, खेर्डा व परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने मोरेगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर जयसिंग शेळके, सतीश काकडे, दत्ता आंधळे, डॉ. विश्वास शेळके, सुभाष काकडे, डॉ. संतोष काकडे, रमेश काकडे, शिवाजी आकात, महिंद्रा गाडे, शिवाजी शेळके, नागेश आंधळे, कल्याण शेळके, मुन्ना आंधळे, माणिक शेळके, नामदेव बानाईत, राहुल काकडे, नारायण गाडे, मारोती राऊत, सुभाष गाडे, गणेश आंधळे, राहुल ठाकरे, सचिन राऊत, सुनील पुरी, रामप्रसाद बोराडे, अंकुश खंदारे, दत्ता रोकडे, विकास सहेजराव, जगन्नाथ राऊत, शेख आन्सर, नागनाथ ठाकरे, सुनील काकडे, विक्रम आंधळे, राजेश राऊत, प्रकाश गायके आदींसह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ग्रीष्म वैशाखातील वनसृष्टीचे अंतरंग

उन्हाळ्यात मार्च महिन्यापासून उष्णतेचे प्रमाण जास्त वाढत जाते.थंड पाण्याची चाहूल प्रत्येकाला लागते, अशावेळी वैशाख महिन्यात ग्रीष्म ऋतूला सुरुवात होते.जंगलातील तापलेल्या रानवाटा उष्णतेच्या दाहमुळे ओसाड पडलेल्या दिसतात. डोंगराळ भागात दऱ्याखोऱ्यात, कडेकपारीत सरपटणारे प्राणी स्वताचा जीव धोक्यात घालून बीळात राहून संरक्षण करतात, मधमाशा पाण्यासाठी वणवण भटकत नदीच्या, वहळाच्या काठावर पाणवठ्यावर कादवाळी चिखलात रुतून बसतात,

नदी किनारी भागात दहाडातील चोंढीतील पाणी आटायला लागले की साचलेल्या पाण्यात मासे वळवळत असताना दिसतात कवी काळूदास कनोजे यांनी 'जलचरांचे दुःख' या कवितेत असे वर्णन केले आहे की,

_धार आटली नदीची_
_दिसे उघडी बोडकी_
_काळ्या गढूळ पाण्यात_
_मासे बुडवती डोकी_
_जल जीवांचे वास्तव्य_
_काळ्या गढूळ पाण्यात_
_वाट पाहत नभांची_
_जीव धरून मुठीत_

उन्हाळ्यात नदी नाले व पाणवठे आटल्यामुळे नदी किनारी निळा फेदोर, गाळ सूकुन वाळून जातो, साचलेल्या पाण्यात मासे वरखाली हालचाल होतांना दिसतात अशा वेळी शेतात काम करायला येणाऱ्या,जाणाऱ्या शेतकरी महिला मासे शेला,फडकी घेऊन लोदायला ( पकडायला ) जातात. आटलेल्या अर्ध्या पाण्यात काळ्या डोहाच्या गाळात मांसाहारी बगळे,पाणडोसले इतर पक्ष्यांचे पावलांचे नक्षीदार ठसे उमटलेले दिसतात. वैशाख महिन्यात ग्रीष्म ऋतूतील उष्ण वातावरणातील डोहातील माशांचे वर्णन केले आहे.

पाळीव प्राणी जनावरे मात्र वाळलेल्या चाऱ्यासाठी रानोमाळ भटकंती करत आपली जीभ लपकवताना दिसतात,पायवाटेने येणारे,जाणारे वाटसरू तसेच शेतकरी आंब्याच्या झाडाखाली थोडावेळ विश्रांती घेतात, शहरात तर उन्हाळ्यात विरळ शांतता पसरली असते, एखादा भिकारी अंगावर उन्हाचे गरमागरम चटके सहन करून पायी चालत चेहऱ्यावर ना दुःख ना आनंद घेत स्मित हास्य करत मिळेल त्या ठिकाणी रस्त्यावर कडेला उपहारगृहाचे परिसरात खाद्य पदार्थ शोधत भटकंती करताना दिसतो. अशावेळी जंगलात वनस्पती सृष्टीत फुलं फळांना बहरच येत असतो, परंतु सगळ्याच वनस्पती फळा फुलांनी बहरत नाही हे पण खरे आहे.

गुलमोहर हे पाणझडी झाड ग्रीष्म ऋतूत वातावरणात लाल भगव्या फुलांनी सजवलेल्या फांदीवर बहरून जाते. झाडावर भगव्या फुलांचा जणू मंडपच सजवल्याचा भास मनाला होतो, उन्हाची कडक सोनेरी किरणे दिवसागणिक गरमीने वाढत जातात तशी गुलमोहराची फुले देखाव्यांची लाल चादर नजरेत भरताना लक्ष वेधून करून घेत असतात. शहरातील रस्त्यांवर दळणवळण करणारे प्रवासी रस्त्याच्या कडेला बहरलेल्या लाल भगव्या गुलमोहराचा आनंद घेत असतात. हा गुलमोहर बेतलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी सामना करण्यासाठी उन्हात फुलून वाट दाखवत आहे. असा विचार मनात येतो.याच वैशाख महिन्यात ग्रीष्म ऋतूत चिंचेची झाडं लहान, लहान फुलांनी बहरून जातात त्याची जाड सावली पसरली जाते. सादड्याची झाडं रानात पांनगळी नंतर फुलांनी बहरून जातात,कोडई हे चिकाळ झाडं रानात पांढऱ्या रंगाच्या फुलांनी बहरून जाते,आंब्याच्या झाडाखाली पिकलेल्या साकांचा (फळांचा) खच पडलेला असतो,मोह झाडं हिरव्या रंगाची फळांनी बहरून जातात नदी किनारी जामणीची झाड ग्रीष्म ऋतूत जांभळ्या फळांनी बहरून जातात, जंगलात बहावा वृक्ष पिवळ्या रंगाचे फुलांनी भरून जातो तर कडुलिंबाची झाडं रानात पांढऱ्या रंगाच्या फुलांनी बहरून जातात याच महिन्यात रानात डोंगराळ भागात दऱ्याखोऱ्यात, कडेकपारीत झुरडात दिहगडी वेल रानभाज्या उगवायला सुरुवात झाली आहे.

**संकलन : सुभाष कामडी**
**( आदिवासी साहित्य अभ्यासक )**

# महाराणा प्रताप विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**

**सिद्धार्थ धंदरे.बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :** चिखली येथील महाराणा प्रताप विद्यालय चिखली. यंदाच्या दहावी एसएससी परीक्षेचे निकालात पुन्हा एकदा उज्वल यशाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. सन 2025 2026 या शैक्षणिक वर्षात विद्यालयाचा एकूण निकाल 96.66 टक्के लागला असून, विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयातून एस.एस.सी परीक्षेला एकूण 60 विद्यार्थी बसले होते त्यापैकी 59 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यामध्ये चि.पार्थ किरण करवंदे याला 94% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. वल्लभ ढोकणे 86.80% तर पायल शिंगणे 83% अविनाश परिवार ८२ % श्रावणी पुंड 80.60% तसेच इतर प्राविण्यश्रेणीमध्ये 13 प्रथम श्रेणीमध्ये 26 द्वितीय श्रेणीमध्ये 15 तर तृतीय श्रेणीमध्ये च04 असे एकूण 59 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या निकालामुळे विद्यालयाचे शिस्तबद्ध अध्यापन पद्धतीसह विद्यार्थ्यांची मेहनत व शिक्षकांचे मार्गदर्शन



अधोरेखित झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष इंजिनीयर डी एन इंगळे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. तसेच मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक यांच्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळे विद्यालयाने यशस्वी परंपरा कायम राखल्याचे त्यांनी नमूद केले.

# नाशिक येथे "महाराष्ट्र क्रीडा विकास प्रतिष्ठान" ची स्थापना

## महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेची स्थापना, रवींद्र नाईक यांची माहिती

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : खेळाडूंचा सर्वांगीण विकास आणि क्रीडा क्षेत्रातील विविध आव्हानांवर मात करण्यासाठी "महाराष्ट्र क्रीडा विकास प्रतिष्ठान" ही नवीन संस्था स्थापन करण्याबाबतचा महत्त्वपूर्ण विचार-विनिमय नाशिक येथे पार पडला.

सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांच्या पुढाकाराने हॉटेल रामा हेरिटेज येथे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ, मार्गदर्शक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून संस्थेच्या भविष्यातील वाटचालीवर चर्चा केली.

खेळाडूंना मिळणार हक्काचे व्यासपीठ "खेळ हेच साधना, यश हीच ओळख" हे ब्रीदवाक्य समोर ठेवून या प्रतिष्ठानच्या माध्यमातून राज्यातील खेळाडूंना विज्ञानावर आधारित प्रशिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील प्रतिभा शोधण्यावर (Talent Identification) संस्थेचा भर असेल, अशी माहिती रवींद्र नाईक यांनी दिली.

२२ सूत्री कार्यक्रमावर सविस्तर चर्चा : या बैठकीत संस्थेच्या कार्याची व्याप्ती स्पष्ट करण्यासाठी २२ मुख्य उद्दिष्टांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे.

प्रशिक्षण आणि साहित्य : खेळाडूंना आधुनिक प्रशिक्षण देणे, क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणे आणि दुखापतींनंतर पुनर्वसनासाठी (Rehabilitation) मदत करणे.

कौशल्य विकास : ""स्किल इंडिया मिशन" आणि ""एनएसडीसी" च्या मान्यतेने खेळाडूंसाठी विविध कौशल्य विकास कोर्सेस आणि करिअर मार्गदर्शन



केंद्र सुरू करणे.

पारंपरिक खेळांचे जतन : आधुनिक खेळासोबतच भारतीय पारंपरिक खेळांचा प्रचार आणि प्रसार करणे.

प्रसिद्धी आणि जनजागृती : पॉडकास्ट, यूट्यूब चॅनेल आणि कम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून खेळाडूंना प्रसिद्धी मिळवून देणे.

शासकीय सहकार्य : शासनाच्या क्रीडा योजनांमध्ये सुधारणा सुचवणे आणि खेळाडूंचे अधिवेशन भरवून त्यांच्या अडीअडचणी सरकारपर्यंत पोहोचवणे.

मान्यवरांची उपस्थिती : या बैठकीला क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या बैठकीला क्रीडा समुपदेशक श्रीमती जयश्री खिलारी, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, शिव छत्रपती पुरस्कार विजेते अशोक दुधारे, शिव छत्रपती पुरस्कार विजेते आणि आंतरराष्ट्रीय कबड्डी कोच शैलजा जैन, खोखो क्रीडा संघटक श्री मंदार देशमुख, शिव छत्रपती पुरस्कार विजेते आनंद खरे, आंतरराष्ट्रीय धावपटू मोनिका अथरे, प्रा हेमंत पाटील, रिटायर्ड विंग कमांडर प्रदीप बागमार, प्रा. दीपक जुंद्रे, बॅडमिंटन कोच मकरंद देव, डॉ दिपक क्षत्रिय, हेमंत काळे, फिजिओथेरपीस्ट डॉ. नील शहा, ॲथलेटिक्स कोच सिद्धार्थ वाघ, बॅडमिंटन संघटक अनंत जोशी, विलास गायकवाड, आदिवासी विकास विभागाच्या जयश्री जेजुरकर, क्रीडा पत्रकार फणींद्र मंडलिक, माजी अधिक्षक, जिल्हा न्यायालय दीपक मोरवाल, प्रा हेमंत काळे, आदिवासी क्षेत्रात क्रीडा मार्गदर्शक दिनेश पागी, इंजी. नरेंद्र बिरार, अंकिता धेरमले, उपप्राचार्य आणि कौन्सेलर संगीता पवार, सायक्लिस्ट स्नेहल देव, अधीक्षक आदिवासी विकास विभाग अरुण बगले, हिरामण टोपले, आदिवासी भागात खेळाडू कार्यकर्ता संजय गवळी, विशाल भुसारे, श्री भूषण पाटील, कामिनी केवट, सुनील गायकवाड, इंज श्री विजय खटोड, तालुका क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, आंतरराष्ट्रीय डिफ क्रिकेटर सुदिश नायर, बास्केटबॉल खेळाडू दीपशिखा रे आदी प्रतिनिधींनी या मोहिमेत सहभाग दर्शवला आहे. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत माजी जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी "महाराष्ट्र क्रीडा विकास प्रतिष्ठान" च्या स्थापनेचा संकल्प मांडला.

भविष्यातील वाटचाल सी.एस. आर. निधी आणि विविध संस्थांशी सामंजस्य करार करून खेळाडूंना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा मानस रवींद्र नाईक यांनी व्यक्त केला.

खेळाडूंचे कौन्सिलिंग आणि क्रीडा मार्गदर्शकांसाठी "ट्रेन द ट्रेनर" हा उपक्रम राबवून प्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. या बैठकीमुळे महाराष्ट्राच्या क्रीडा विश्वात एक नवीन आणि सकारात्मक पाऊल पडले असल्याचे बोलले जात आहे.

# चाणजे ग्रामपंचायत हद्दीत डेंग्यूचे थैमान !
## 22 वर्षीय तरुणीचा मृत्यूनंतर प्रशासनला जाग

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : रायगड जिल्हयातील उरण तालुक्यात सुमारे 30000 हजार इतक्या सर्वात मोठया लोकसंख्येची आणि 3 कि.मी. क्षेत्रफळ असणारी 17 सदस्य असणारी चाणजे ग्रामपंचायत नेहमीच भ्रष्टाचाराच्या गर्तेत आणि चर्चेत राहिलेली आहे, अनेक जमिनीच्या घोटाळयाचे वादळ आणि वादग्रस्त ठरलेल्या चाणजे ग्रामपंचायत बरखास्त होऊन शासकीय प्रशासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या या ग्रामपंचायतप्रशासनाला व प्रशासकीय अधिकाऱ्याला नालेसफाई व कचरा उचलण्यास वेळ नसल्याने परिसरात कोणताही भ्रष्टाचार न करता आपले कर्तव्य डासांनी चोख बजावीत डेंगूची साथ घेऊन परिसरात झेप घेतली आहे.खरात बाबांच्या जमिनीच्या वराती पासून विविध जमीन घोटाळे.माती चोरी,भष्ट्राचारयाचा शृंखलेत आता डेंग्यूने चाणजे ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय अधिकाराच्या शिरपेचात मनाचा तुरा खोवत आपले हातपाय वेगाने पसरले असून डाऊर नगर येथे आतापर्यंत 3 जणांना डेंगूची लागण झाली, त्यापैकी एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.डेंग्युची साथ रोखण्यासाठी नेहमीच वरती मागून घोडे हाकणाऱ्या आरोग्य विभागाने युद्ध पातळीवर उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे

रहिवाशांना नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यापेक्षा ग्रामपंचायतीत एनकेन



प्रकारे भ्रष्टाचार कसा करता येईल याकडे सरपंचासह सर्वसदस्यांचे लक्ष केंद्रित असल्यामुळे नागरी सुविधांसाचा वनवा असल्याने ग्रामस्थांना मोठा संघर्ष करावा लागत आहे.यातच आत्ता ग्रामपंचायत बरखास्त झाल्याने मुळातच नागरिकांना पाणी पुरवठा वेळेवर होतनसल्याने न झाल्याने व अपुरा होत असल्याने नागरिक मोठ्या प्रमाणात पाणी साठवून ठेवतात,साठवून ठेवावे लागत आहे. साठवून ठेवलेल्या स्वच्छं पाण्यात डेंग्यूच्या डासांना अंडी घालणे त्यांच्या आरोग्यास सोयीचे वाटत असल्याने त्यांची उत्पत्ती मोठया प्रमाणात वाढत आहे.



तसेच नाले व उघड्या जागांवर ओल्या-सुक्या कचऱ्याने प्रचंड थर साठल्यानेप्रशासकीय अधिकाऱ्याचे आभार मानीत परप्रांतीया प्रमाणे मच्छरनी आपला प्रादुर्भाव सर्वशक्तीनीशी वाढवला आहे.त्यामुळे गेल्या 15 दिवसांत चाणजे ग्रामपंचायतीच्या हद्दी मधील डाउरनगरमध्ये डेंगूचे 3 रुग्ण आढळले. यातील एका 22 वर्षीय तरुणीचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला, अन्य 4 जणांवर खासगी व सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. इतके होऊनही ग्रामपंचायत प्रशासनाने नालेसफाई, औषध फवारणी किंवा गटारे स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली नाही.मात्र या घटनेने झोपेत असलेल्या आरोग्य विभागाची झोप उडाली असून आरोग्य विभागाने सदर परिसरात कीटकनाशक औषधाची फवारणी करण्यास सुरुवात केली आहे. साठवून ठेवलेल्या पाण्याच्या बाबत सुरक्षितेची काळजी कशी घ्यावी याबाबत नागरिकांना आरोग्य विभागाकडून मार्गदर्शन करण्यात येत आहे,शासकीय पातळीवर उपाय योजना सुरु असल्याने रहिवाशांनी घाबरून न जाण्याचे आवाहन तालुका आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

# सर्वसामान्य ग्रामस्थांना देखील करता येणार थाटात विवाह सोहळा

## थ्री स्टार राज रिसॉर्ट यांचा स्तुत्य पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : पनवेल तालुक्यातील उसर्लि बुद्रुक येथे असलेल्या थ्री स्टार राज रिसॉर्ट यांच्या वतीने पनवेल शहर व आजूबाजूच्या गावातील रहिवाशांसाठी एक स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सर्वसामान्य रहिवाशांना देखील थाटामध्ये विवाह सोहळा साजरा करता यावा या उद्देशाने स्थानिक रहिवाशांसाठी अत्यल्प शुल्कामध्ये रॉयल वेडिंग प्लॅन लाँच करण्यात आला आहे. बजेट फ्रेंडली पॅकेज मुळे कित्येक गरजवंत कुटुंबांचे थाटात लग्न करण्याचे स्वप्न त्यामुळे पूर्ण होणार आहेत.

याबाबत प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधताना राज रिसॉर्टचे संस्थापक तथा मुख्य संचालक, माजी नगरसेवक संतोष उरणकर म्हणाले की अवघ्या ५० हजार रुपयात आम्ही ८०० लोकांची क्षमता असलेले प्रशस्त हिरवेगार मॅरेज लॉन आणि त्यासोबत वधू पक्ष आणि




वरपक्ष यांना प्रशस्त वातानुकूलित रूम्स ऑफर करत आहोत. अवघ्या १ लाख रुपयांत स्वागत समारंभासाठी आकर्षक स्टेज सजावट,अप्रतिम एन्ट्री गेट, बुफे सेटअप,३०० खुर्च्या,१५ टेबल, संपूर्ण लॉन परिसराला मिरची लाईट आणि रॉयल हॅलोजन प्रकाशयोजना, डी जे संगीत सिस्टीम,२ कुलर, वेलकम बोर्ड अशा दणकेबाज सुविधा मिळतील.ते पुढे म्हणाले की ताजे व लजीझ भोजन व्यवस्थादेखील आम्ही या पॅकेज मध्ये ऑफर करत आहोत. यामध्ये ग्राहकांच्या पसंतीची दोन ज्यूस, ग्राहकांच्या पसंतीच्या दोन भाज्या, चपाती, पुरी, दाल तडका, पुलाव,जीरा राईस, गुलाब जाम, आईस क्रीम, मिनरल ड्रिंकिंग वॉटर आणि मुखवास असे परिपूर्ण भोजन अवघ्या माणशी ५०० रुपयांमध्ये मिळणार आहे.वास्तविक सध्या पनवेल ग्रामीण परिसरामध्ये विवाह सोहळा करण्यासाठी एखाद्या शेतामध्ये जेसीबी लावून लेव्हल करावी लागते. या ठिकाणी विवाह सोहळा करण्यासाठी मंडप डेकोरेशन आणि बुफे सेटअप यासाठी खर्च करावा लागतो. इतके सगळे केले तरी धुळीचा त्रास होतो तसेच एप्रिल आणि मे महिन्यात प्रचंड गर्मीचा जाच सहन करावा लागतो. खर्च करून देखील थाटात विवाह सोहळा केल्याचे सुख तिथे कुटुंबांना मिळत नाही. पनवेल शहरात देखील थाटात विवाह सोहळा आयोजित करणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेलेले आहे.अशा समस्त कुटुंबीयांसाठी थ्री स्टार राज रिसॉर्ट यांची बजेट फ्रेंडली वेडिंग प्लॅन ही ऑफर खरोखरच वरदान ठरणार आहे. नुकतेच राज रिसॉर्ट ला थ्री स्टार दर्जा मिळालेला आहे. या ठिकाणी डेडिकेटेड रेस्टॉरंट ग्राहकांच्या सेवेत रुजू असून प्रशस्त स्विमिंग पूल मुळे इथे एक आरोमॅटीक व्हेकेशन फील येतो त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील पाहुणेदेखील राज रिसॉर्टची निवड करत असतात. आशा आलिशान ठिकाणी थाटामध्ये लग्न करायला मिळणे ही खरोखरच पनवेल शहर आणि आजूबाजूच्या गावातील रहिवाशांसाठी एक पर्वणी ठरणार आहे.या सुविधेचा लाभ घेण्यासाठी ९८१९३४४१११,९८१९३४४२२२या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन संचालकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रेवदंडा कृषी संस्थेचा कांदळवन कत्तल, २५ वर्षांचा करोडोचा काळाबाजार; बड्या अधिकाऱ्यांचे हात सापडले!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रेवदंडा सामुदायिक सहकारी कृषी संस्थेने सभासदांना शेतीसाठी दिलेल्या ८० एकर शासकीय भूखंडावर अतिक्रमण करून कांदळवनाची कत्तल करून बेकायदा व्यावसायिक बांधकामे उभारली आहेत. थेरोंडा रोडवर काळे-हिरवे नेट लावून रस्त्यावर अतिक्रमण, थेरोंडा वरसोल पाडा स्मशानभूमी गिळंकृत करणे आदी प्रकारांनी ग्रामस्थांमध्ये संतापाची लहर उसळली आहे. संस्थेचे पदाधिकारी मात्र 'कुठेही तक्रार करा, आमचं कोणीही काही वाकड करू शकत नाही, शासकीय अधिकारीही आम्हाला स्पर्श करू शकत नाही,' असं उघडपणे सांगत आहेत.

**चौकशीचे आदेश 'बंद पाकिटात'**

जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चौकशीचे आदेश दिले होते, मात्र ते 'बंद पाकिटात' बंद झाल्याचे चर्चेत आहे. संस्थेने ५० सभासदांचे सदस्यत्व बेकायदेशीर रद्द केले असून,



पैशाचा करोडो रुपयांचा काळाबाजार २५ वर्षांपासून सुरू आहे. यात राज्य शासनातील काही बड्या अधिकाऱ्यांचे हात असल्याचे ग्रामस्थांचे आरोप आहेत, ज्यामुळे शासनाच्या कान खणणे आवश्यक झाले आहे.

*संस्था बरखास्ती व जमीन परत शासन जमा*

सहकार विभागाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७८ नुसार संचालक मंडळाला 'बरखास्त का करू नये' अशी कारणे दाखवा नोटीस बजावली. जिल्हाधिकाऱ्यांनी शासकीय जमिनीचा गैरवापर झाल्याने 'जमीन शासन जमा का करू नये' अशी नोटीस दिली असली, तरी कारवाई अजिबात दिसत नाही. १३ जुलै १९६८ रोजी नोंदणीकृत झालेल्या या संस्थेने सुरुवातीला १२६ सभासदांसाठी शेती जमीन घेतली, पण आता ती व्यावसायिक हेतूने विकृत केली.

*कांदळवन संरक्षणाला छेद, मच्छीमारांचे संकट*

नैसर्गिक भरती-ओहोटी जलप्रवाह अवैधपणे बंद करून बंधाऱ्यावर मोठे दगड लावले गेले असून, कांदळवन कोरडे पडून नष्ट होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या कांदळवन संरक्षण धोरण २०१८ (कोकण विभागीय आयुक्तांच्या सनियंत्रण समितीखाली), महाराष्ट्र वन (संरक्षण) अधिनियम १९८० व CRZ अधिसूचना २०१९ ला हे छेद देणारे कृत्य आहे. पावसाळ्यात माशांच्या प्रजननावर विपरीत परिणाम होईल, थेरोंडा खाडीची जैवविविधता धोक्यात येईल व स्थानिक मच्छीमारांची उपजीविका धुळीस मिळेल. उच्च न्यायालयाने रायगड जिल्ह्यातील ४,४११ हेक्टर कांदळवन संरक्षणाचे निर्देश दिले तरी अंमलबजावणी कोलमडली.

**ग्रामपंचायतीचं मौन, ठोस कारवाईची मागणी**

रेवदंडा ग्रामपंचायतीत १० वर्षांपासून हा विषय ग्रामसभेत चर्चेत येतो, पण ठोस निर्णय नाही. ग्रामपंचायत गप्प का? असा संताप ग्रामस्थांना आहे. वन विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ व पोलिसांना कळवून IPC कलम ४२६, ४२७ अंतर्गत अजामीनपात्र गुन्हा दाखल करावा, संस्था बरखास्त करावी, जमीन परत शासन जमा करावी. केंद्र व महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा पर्यावरण व स्थानिक उपजीविकेला धोका निर्माण होईल.

**रेवदंडा ग्रामविकास अधिकारी यांना थेरोंडा रोडवर रेवदंडा सामुदायिक कृषी सस्थेच्या जागेतील लोकांनी अतिक्रमण केल्याचे विचारलं असता त्यांनी सांगितले रेवदंडा कृषी संस्थेच्या अध्यक्षांना नोटीस देऊन अतिक्रमण हटवायला सांगतो**

**रेवदंडा ग्रामविकास अधिकारी.**
**सुदेश राऊत**

**"रेवदंडा कृषी संस्थेच्या शासकीय जमिनीवर केलेल्या अतिक्रमणाने कायदा कोलमडला आहे! थेरोंडा रोडवर काळे-हिरवे नेट लावून रस्ता गिळंकृत करणे चुकीचे आहे,ग्रामपंचायतीने तात्काळ अतिक्रमणे हटवावीत**

**निलेश खोत**
**सामाजिक कार्यकर्ते**

# आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग मध्ये भविष्य समोर ट्रेनिंग ला सुरुवात




**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : दिनांक 9 मे 2026 रोजी आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग लाखनी मध्ये भविष्य समोर ट्रेनिंगला सुरुवात झाली. सुरुवातीच्या पहिल्याच दिवशी AIM HIGH MPSC - UPSC अकॅडमी चे संचालक श्री अमितजी सवाई सर यांनी विद्यार्थ्यांना खूप मोलाचे मार्गदर्शन देत आणि एमपीएससी यूपीएससीच्या महत्त्व समजावून त्यांच्या प्रशिक्षणाला सुरुवात केली. सर्व विद्यार्थी एकाग्रचित्ताने तब्बल अडीच तास अमित सरांचं प्रशिक्षण ऐकत होते. एमपीएससी यूपीएससी परीक्षेमध्ये अति महत्त्वाचे सात विषयांची ओळख करून दिल्यानंतर अमित सरांनी सर्वात महत्त्वाचा विषय हाती घेतला तो म्हणजे भूगोल. खूप सोप्या पद्धतीने भौगोलिक ज्ञान मुलांपर्यंत पोहोचवण्याची सुरुवात अमित सरांनी केली. भविष्य समर ट्रेनिंगचं महत्व उत्कृष्टपणे विद्यार्थी आणि पालकांना समजावून सांगितल्यानंतर लगेच सरांनी त्यांच्या मुख्य विषयाकडे वळण घेतली. भौगोलिक क्षेत्रामधील काही बेसिक बाबी त्यामध्ये समुद्र आणि त्याचे राजकीय वर्गीकरण, टेरिटोरियल वॉटर, एक्सक्लुझिव्ह इकॉनॉमिक झोन, हाय सी अशा खूप बेसिक भौगोलिक ज्ञान अमित सरांनी विद्यार्थ्यांना दिला. लॅंडफॉर्म्स जसे लेक, स्ट्रेट, इसथमस, गल्फ आणि बे या अति महत्त्वाच्या भौगोलिक बाबींना खूप सविस्तरपणे विद्यार्थ्यांना समजवले. लाखनी तालुक्यातील विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांचे आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंगचे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी आभार मानले आणि अशाप्रकारे भविष्य समोर ट्रेनिंगचं पहिले दिवसीय प्रशिक्षण संपले.

संक्षिप्त

## पोलिसांनी वाचवले महिलेचे प्राण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** तलावात उडी मारलेल्या महिलेला पोलिसांनी बाहेर काढून तिचा जीव वाचवला. या पोलिसाचे विविध स्तरातून कौतुक केले जात आहे.रविवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास नवी मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षात रोडपाली येथील विसर्जन तलावात एका महिलेने उडी मारल्याचा फोन आला. त्यानंतर ही माहिती कळंबोली पोलीस ठाण्याला देण्यात आली. रोडपाली परिसरात गस्त घालत असलेले बीट मार्शल पोलीस शिपाई आकाश वानखेडे आणि पोलीस शिपाई सागर माळी हे काही मिनिटात घटनास्थळी पोहोचले. यावेळी सागर माळी यांनी पाण्यात उडी घेतली. त्यांनी या महिलेला नागरिकांच्या मदतीने सुरक्षित बाहेर काढून एमजीएम रुग्णालयात दाखल केले. काही वेळानंतर या महिलेचा भाऊ घटनास्थळी पोहोचला. ही महिला मानसिक आजाराने त्रस्त असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी दाखवलेल्या या धाडसाचे कौतुक केले जात आहे. अवघ्या काही मिनिटात या महिलेची सुखरूप पणे सुटका करण्यात आली.

## पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** अल्पवयीन पीडित मुलीकडे घाणेरड्या नजरेने पाहिल्याप्रकरणी आरोपी दादाराव बबन भगत (राहणार आजीवली गाव) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात नऊ मे रोजी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना नऊ मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास साईनगर परिसरात घडली.

## दोन लाखांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** 20 यु एस डॉलरच्या 500 नोटा एक्सचेंज करण्यासाठी देतो असे सांगून दोन लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी शफीकुल (राहणार कळंबोली), रफिक आणि अनोळखी इसम अशा तिघांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात दहा मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.रोहित राजबहादूर गौतम (राहणार लोधा पलावा, डोंबिवली) याला अरमानो आर डाऊन टाऊन लोधा, पलावा परिसरातील तलावाजवळ तीन इसम भेटले आणि 20 युएस डॉलरचे 500 नोटा एक्सचेंज करण्यासाठी देतो असे सांगून त्यांना सिटी हॉस्पिटल, कळंबोली येथे कागदी पेपर रोल देऊन त्यांची दोन लाखांची आर्थिक फसवणूक केली.

## पन्नास हजार रुपयांचा गांजा जप्त

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** खांदेश्वर पोलिसांनी 50 हजार रुपयांचा गांजा जप्त करत आरोपी विरोधात 11 मे रोजी गुन्हा दाखल केला.10 मे रोजी रात्री एचडीएफसी सर्कल जवळ एक इसम गांजा हा अमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी एचडीएफसी सर्कल पासून पनवेलकडे जाणाऱ्या ब्रिजखाली वैभव जावजी रिंगे (राहणार सेक्टर 6 नवीन पनवेल) याच्याकडून 501 ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला.

## दारूच्या बाटल्या आणि रोख रकमेची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल शहरातील सिटी वाईन शॉप मध्ये प्रवेश करून चोरांनी दोन लाख 76 हजार 650 रुपयांची दारूच्या बाटल्या, रोख रक्कम आणि सीसीटीव्ही फुटेजचा डीव्हीआर संच चोरून नेला. या प्रकरणी 10 मे रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नऊ मे रोजी रात्री सिटी वाइन शॉप, ओम साई बिल्डिंग, गार्डन हॉटेल शेजारी, ठाणा नाका, पनवेल या वाईन शॉपच्या शटरची कडी कोयांडा तोडून चोरांनी आतमध्ये प्रवेश केला आणि दारू आणि रोख रक्कम चोरून नेले.

# डायल ११२ प्रणालीमुळे वाचले महिलेचे प्राण ; पोलिसांचा करण्यात आला सत्कार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** पोलीस अंमलदार आकाश वानखेडे, सागर माळी असे बिट मार्शल १ कर्तव्यावर असताना त्यांना १२.३० वा. रोडपाली गणपती विर्सजन तलावमध्ये एका महिलेने पाण्यात उडी मारली आहे, पोलीस मदतीची आवश्यकता आहे. असा नियंत्रण कक्ष, नवी मुंबई येथुन M.D.T. वर कॉल प्राप्त झाला.

सदर वेळी पोलीस अंमलदार आकाश वानखेडे, सागर माळी यांनी घटनेचे गांभीर्य ओळखुन तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी पोहचले असता त्यांना तलावात उडी मारलेली महिला तलावाचे मध्यभागी बुडत असल्याचे दिसले. पोलीस अंमलदारसागर माळी यांनी क्षणाचाही विचार न करता आपल्या जिवाची पर्वा न करता महिलेचे प्राण वाचविण्याकरीता तलावात उडी मारली. तलावाचे ठिकाणी हजर असणारे नागरिक यशु सिंग यानेही




पोलीस महिलेला बाहेर काढत असताना त्यांना मदत म्हणुन तलावात उडी मारली. महिलेला खेचत किना-याजवळ आणले. किना-यावर उभा असलेल्या पोलीस अंमलदार आकाश वानखेडे यांचे मदतीने महिलेला तलावाबाहेर काढले. महिलेच्या पोटात पाणी गेल्याने ती बेशुध्द अवस्थेत होती. तात्काळ प्रथमोपचार म्हणुन पोलीस अंमलदार आकाश वानखेडे यांनी महिलेच्या पोटावर दाब देवुन पोटातील पाणी बाहेर काढले. त्यानंतर महिला थोडा श्वास घेवु लागली.

सदर महिलेला आजुबाजुचे नागरिकांच्या मदतीले सरकारी वाहनात बसवत असताना तीचा मोठा भाउ हा शोध घेत रोडपाली तलावाजवळ आला. त्यांचेसह महिलेला तात्काळ जवळच असलेल्या आशा हॉस्पीटल, सेक्टर १६, रोडपाली येथे नेले. त्यांनतर तीला उपचाराकरीता एम.जी.एम. हॉस्पीटल येथे नेण्यात आले. सदर महिलेची तब्बेत आता स्थित असुन महिला सुखरूप आहे. महिलेचे अनमोल प्राण वाचविण्याकरीता रोडपाली तलाव येथे प्रत्यक्ष घटना पाहणारे व तात्काळ डायल ११२ वर कॉल करून माहीती देणारे श्री बळीराम म्हात्रे, घटनेचे गांभीर्य ओळखुन डायल ११२ वर प्राप्त झालेला कॉल कळंबोली बिट मार्शलला वर्ग करणारी नियंत्रण कक्ष, नवी मुंबई येथील महिला पोलीस अंमलदार प्रतिक्षा गायकर, घटनेचे गांभीर्य ओळखुन कॉल प्राप्त होताचा तात्काळ घटनास्थळी रवाना झालेले व जिवाची पर्वा न करता पाण्यात उडी मारून महिलेचा जीव वाचवणारे पोलीस अंमलदार सागर माळी, महिलेच्या पोटात पाणी गेल्याने प्रसंगावधान दाखवुन बेशुध्द झालेल्या महिलेला वेळीच प्रथमोपचार देवुन पोटातील पाणी बाहेर काढणारे पोलीस अंमलदार आकाश वानखेडे व पोलीसांना पाण्यात उडी मारलेली पाहुन महिलेला बाहेर काढण्यास स्वतः पाण्यात उडी मारून पोलीसांना मदत करणारे यशु सिंग यांनी मोलाची भुमीका बजावली आहे.मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी पोलीस अंमलदार यांचा यथोचित सत्कार करून भविष्यात पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अशी कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहीत केले. घटनेची तात्काळ माहीती देणारे श्री बळीराम म्हात्रे व घटनास्थळी मदत करणारे श्री यशु सिंग यांचाही श्री विक्रम कदम, सहा. पोलीस आयुक्त, खारघर विभाग, नवी मुंबई यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला आहे. नागरिकांची सतर्कता व प्रसंगावधान तसेच डायल ११२ च्या योजनेमुळे महिलेला तात्काळ मदत मिळुन महिलेचे अनमोल प्राण वाचले आहेत. नागरिकांनी मदतीच्या काळात डायल ११२ चा वापर करावा असे आपल्या माध्यमातुन आवाहन करण्यात येत आहे.

## सोयगांव येथे श्री दुर्गा भवानी माता मंदिरात दि.१३/१४ मे ला चरणकमल प्रतिष्ठापनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** सोयगाव शहरातील व परिसरातील प्रसिद्ध श्री दुर्गा भवानी माता मंदिर, भवानीनगर सोयगांव येथे चरणकमल (चल) प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. असून हा धार्मिक सोहळा दिनांक १३ मे २०२६ ते १४ मे २०२६ दरम्यान मोठ्या भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.या सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.दि.१३ मे २०२६ बुधवार रोजी सकाळी ८ वाजता चरणकमल नगर प्रदक्षिणेने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.दुपारी ३ वाजता पिठ स्थापना,ग्रहांचे हवन तसेच कुमारीका पूजन होणार आहे. रात्री ८ वाजता जाहीर कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून कीर्तन सेवा ह.भ.प.जितेंद्र महाराज पंडीत,सोयगांव हे करणार आहेत.दि.१४ मे २०२६



गुरुवार रोजी सकाळी ८ वाजता चरणकमल अभिषेक व प्रतिष्ठापना,

उत्तरांग हवन, पूर्णाहुती,आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडणार आहे. तसेच रात्री ८ वाजता गजानन महाराज बावन्नीचे आयोजन करण्यात आले आहे.हा संपूर्ण सोहळा श्री दुर्गाभवानी माता मंदिर, भवानीनगर सोयगांव येथे संपन्न होणार असून शहरातील व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## कर्तव्यनिष्ठ सेवेला मिळाला सन्मान,शेख नसीर यांची सहाय्यक फौजदारपदी पदोन्नती





**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा पोलीस स्टेशनमध्ये हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी शेख नसीर बशीर यांची सहाय्यक फौजदारपदी पदोन्नती झाली असून, त्यांच्या खांद्यावर पोलीस निरीक्षक विनोद घोळवे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी तागड यांच्या हस्ते स्टार लावुन सन्मानीत करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल पाटोदा तालुक्यासह बीड शहरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सन-२००० मध्ये पोलीस दलात निवड झाल्यानंतर शेख नसीर यांनी विविध ठिकाणी उल्लेखनीय सेवा बजावली आहे. त्यांनी ठाणे शहर येथे ०२ वर्षे, केज येथे ०२ वर्षे, शिरूर कासार येथे ०२ वर्षे, बॉम्ब शोधक पथकात तब्बल ०५ वर्षे, स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) मध्ये ०६ वर्षे तसेच पेठ बीड येथे ०४ वर्षे सेवा देत आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. काही दिवसांपूर्वीच ते आपल्या जन्मभूमी असलेल्या पाटोदा शहरात रुजू झाले असून, खाकी वर्दीतील सेवाभावी आणि जनसामान्यांशी आपुलकीने वागणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या अथक परिश्रम, प्रामाणिक सेवाभाव आणि कर्तव्यनिष्ठेमुळे मिळालेली ही पदोन्नती अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी असल्याची भावना नागरिकांनी सत्कार प्रसंगी व्यक्त केली. या वेळी बोलताना शेख नसीर म्हणाले, "जन्मभूमीत मिळणारा सन्मान हा आयुष्यातील सर्वात मोठा आनंद असतो. वरिष्ठ अधिकारी, सहकारी आणि नागरिकांच्या प्रेमामुळेच मला ही वाटचाल शक्य झाली."

# निफाड येथे राष्ट्रीय नाथ संमेलनाचा समारोप; "ही नाथ सेवेची सुरुवात" — गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** "राष्ट्रीय नाथ संमेलनाचा समारोप नसून, ही नाथांच्या सेवेची सुरुवात आहे. हे कार्य गावोगावी पोहोचले पाहिजे," असे प्रतिपादन श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे प्रमुख गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांनी केले. वाढते तापमान, पर्यावरणातील बदल आणि प्रतिकूल घटनांच्या पार्श्वभूमीवर श्री नवनाथांची सेवा समाजासाठी संरक्षण देणारी व फलदायी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सेंद्रिय व आयुर्वेदिक शेतीचा अवलंब करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

त्र्यंबकेश्वर येथील अखिल भारतीय



श्री स्वामी समर्थ गुरुपीठ आणि निफाड येथील श्री स्वामी समर्थ केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय नाथ संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी ते बोलत होते.

कार्यक्रमास आमदार दिलीप बनकर, नगराध्यक्ष कांताबाई कर्डीले, पंढरीनाथ थोरे, सोनिया होळकर, सुवर्णा जगताप, पूनम होळकर, लक्ष्मणनाथ महाराज, संदीप सुराणा, रामप्रभु महाराज, गणेशगिरी महाराज, राजेंद्र राठी, रतन पाटील वडघुले, पवन चोरडिया, मिलिंद चवंडके, कैलास सोनवणे, मधुकर राऊत, विश्वास कराड, विक्रम रंधवे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वागताध्यक्ष वि. दा. व्यवहारे सर यांनी प्रास्ताविक केले. संमेलनात हजारो महिलांनी श्री नवनाथ संकलित ग्रंथाचे सामुदायिक पारायण केले. दुसऱ्या दिवशी विविध विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. मिलिंद चवंडके यांनी "महाराष्ट्रातील नाथसंप्रदाय", श्री ब्रह्मानंद स्वामी यांनी "नवनाथांची चमत्कार शक्ती आणि त्यामागचे तत्वज्ञान", टी. एन. परदेशी यांनी "गोरक्षनाथांची गुरुभक्ती", तर श्रीपाद कुलकर्णी यांनी "नाथसंप्रदाय आणि वारकरी संप्रदाय" या विषयांवर विचार मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद कुलकर्णी यांनी केले. सुभाष खाटेकर यांनी आभार मानले, तर श्रीमती योगिता निगळ यांनी पसायदान सादर केले.

**संमेलनात मंजूर ठराव**

निफाड व परिसराला 'ब' वर्ग पर्यटन तीर्थस्थळ दर्जा देण्यात यावा.

दरवर्षी नाथ साहित्यावर आधारित संमेलन आयोजित करण्यात यावे.


पर्यावरण व जलसंवर्धन अभियान राबविण्यात यावे.

महाराष्ट्रातील नवनाथांच्या नऊ स्थळांना अध्यात्मिक पर्यटन व तीर्थस्थळाचा दर्जा मिळावा.

## एकनाथ खडसे यांना डॉ बाबासाहेब गोपले जीवनगौरव पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** अखिल भारतीय मातंग सेनेच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष योगेश शिंदे आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर मानखुर्द मुंबई येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे निर्माते क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाचे जनक लोकनेते क्रांतीसम्राट डॉ. बाबासाहेब गोपले यांच्या ७३ व्या जयंती निमित्त क्रांतीज्योती कुसुमताई गोपले यांच्या हस्ते एकनाथ अश्रुबा खडसे यांना लोकनेते क्रांतीसम्राट डॉ. बाबासाहेब गोपले संघर्ष नायक जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला.यावेळी समाजभूषण सुदाम आवाडे,





देवेंद्र खलसे, पी. एस. मोतेवाड, सुप्रसिद्ध गायिका मैनाताई कोकाटे, माणिक कोकाटे, मेघराज लोंढे, फळहरी बाबा पंढरपूर, पार्वती आवाडे, अश्विनी शिंदे , शोभाताई लोंढे ,दत्तात्रय आवाडे आधी मान्यवर उपस्थित होते.

## दहावीच्या निकालात चि.शोएब शौकत आतारने मिळवले १०० टक्के गुण

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार रामकिसन कातखडे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे,यांच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त परीक्षेत चि.शोएब शौकत आतारने १००% घेतले आहेत. या विद्यार्थ्याने विक्रम केला असून त्याची तालुक्यात चर्चा होत आहे व अभिनंदन आचा वर्षावही होत आहे.

शिरूर कासार येथील चि.शोएब शौकत आतार या विद्यार्थ्याने इ. १० वी च्या जाहीर झालेल्या निकालात शंभर टक्के गुण घेऊन विक्रम केला आहे. शहरातील कालिकादेवी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. विद्यालयाचे मुख्याध्यापक केशव भांगे यांच्या संकल्पनेतून 'श्रीकालिका गुणवत्ता पॅटर्न'हा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पहिल्यांदाच राबविला होता. परीक्षा मंडळाने यावर्षी सी. सी.टीव्ही कॅमेरे व झूमअॅपद्वारे कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा घेऊनही केवळ श्रीकालिका पॅटर्नमुळेविद्यालयाचा निकाल ९८.६०% लागला आहे. विद्यालयाचे एकूण १४३ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले



होते,त्यापैकी ११० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून २८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत,तर ०३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. चि.शोएब शौकत आतार याने १००% टक्के घेऊन विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविला. कु.अनुष्का निलेश बडे हिने ९८.४०% टक्के घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला तर कु.श्रावणी संभाजी ढवळे ९७.००% टक्के मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला. आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर साहेब,मा.रोहित(भैय्या) क्षीरसागर,प्रशासन अधिकारी डॉ.राजूजी मचाले साहेब,सहा.प्रशासन अधिकारी, श्री योगेशजी पवार साहेब,कार्यवाहक श्री. एम.ए.राऊत सर,प्राचार्य केशव भांगे, उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे,परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,श्रीआप्पासाहेब कांबळे प्रा.विनोद गलांडे,सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी,परिसरातील सर्वच पालकाने,व आजी-माजी विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक-हार्दिक अभिनंदन केले असून,त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# धर्माबाद मध्ये मुरूम माफियांची झाली चांदी, शासनाच्या महसुलाची मात्र वाट लागली!

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सुर्यकार** : धर्माबाद तालुक्यात सध्या मुरूम आणि मातीच्या अवैध उत्खननाने अक्षरशः उच्छाद मांडला असून, शासनाच्या नियमांना केराची टोपली दाखवत माफियांनी संपूर्ण तालुक्यात आपले जाळे पसरवल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. विनापरवाना सुरू असलेल्या या उत्खननामुळे शासनाच्या महसुलाला लाखो-कोट्यवधी रुपयांचा फटका बसत असताना संबंधित महसूल प्रशासन मात्र संशयास्पद शांतता बाळगून असल्याने नागरिकांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागासह शहरालगतच्या परिसरात दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या अंधारात जेसीबी, पोकलेन आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर मुरूम व मातीची वाहतूक सुरू आहे. अनेक ठिकाणी परवानगी नसताना शेकडो ब्रास मुरूम उपसा केला जात असल्याची चर्चा असून, काही ठिकाणी नियमांपेक्षा कितीतरी पटीने अधिक उत्खनन होत असल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत.

विशेष म्हणजे, महसूल विभागाकडून दिल्या जाणाऱ्या परवानग्या केवळ कागदापुरत्याच मर्यादित राहिल्या असून प्रत्यक्षात



मात्र डोंगर पोखरणे, शेतजमिनी उकरून काढणे आणि नैसर्गिक रचनेचा पूर्णपणे विध्वंस करण्याचे प्रकार सुरू आहेत. काही भागात तर रस्त्यालगत मोठमोठे खड्डे निर्माण झाल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमुळे जीवितहानी होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या अवैध

## तालुक्यात मुरूम-माती अवैध उत्खनन जोमात

उत्खननासाठी रात्री उशिरापर्यंत ट्रॅक्टरची अविरत वाहतूक सुरू असल्याने नागरिकांच्या शांततेलाही मोठा भंग होत आहे. धुळीचे प्रचंड प्रमाण वाढल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून, शेतकऱ्यांच्या पिकांवरही विपरीत परिणाम होत असल्याची तक्रार पुढे येत आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमलेली महसूल विभागाची पथके आणि संबंधित यंत्रणा पूर्णतः निष्क्रिय झाल्याचे चित्र आहे. कारवाईच्या नावाखाली केवळ दिखाऊ मोहीम राबवली जाते; मात्र प्रत्यक्षात उत्खनन माफियांना अभय दिले जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. काही ठिकाणी स्थानिकांनी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

पर्यावरणप्रेमींच्या मते, या अनियंत्रित उत्खननामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत असून, भविष्यात पाणीटंचाईचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसेच झाडे, डोंगर आणि नैसर्गिक जलस्रोत धोक्यात आल्याने पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त होत आहे.

तालुक्यात सुरू असलेल्या या बेकायदेशीर उत्खननाविरोधात तातडीने कठोर कारवाई करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी जोरदार मागणी आता नागरिकांमधून होत आहे. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही काही सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# समस्या मुलांमधील डोकेदुखीची



लहान मुलांमध्ये डोकेदुखीची समस्या अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. पालकांसाठी ही चिंतेची बाब असली, तरी बहुतेक प्रकरणांमध्ये ही डोकेदुखी गंभीर नसते. या समस्येची कारणे प्रामुख्याने दोन प्रकारांत विभागली जातात, प्राथमिक आणि माध्यमिक.

प्राथमिक डोकेदुखीमध्ये मायग्रेन म्हणजेच अर्धशिशी आणि 'टेंशन हेडेक' यांचा समावेश होतो. अर्धशिशीमध्ये केवळ डोके दुखत नाही, तर मळमळणे, उलट्या होणे आणि प्रकाश किंवा आवाजाचा त्रास होणे अशी लक्षणे दिसतात. टेंशन हेडेक हे सहसा अभ्यासाचा ताण, अपुरी झोप किंवा मानसिक दडपणामुळे उद्भवते. यामध्ये डोक्याच्या दोन्ही बाजूंना सतत दाब जाणवतो. याशिवाय अनेक शारीरिक आणि पर्यावरणीय घटक कारणीभूत असतात. सर्दी, ताप, सायनस किंवा घशाचे संक्रमण ही सामान्य कारणे आहेत. मुलांच्या डोळ्यांवर ताण येत असेल किंवा त्यांना दृष्टिदोष असेल, तरीही वारंवार डोकेदुखी होऊ शकते.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि कॉम्प्युटरचा अतिवापर, तसेच स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवल्यामुळे डोळ्यांच्या स्नायूंवर ताण येतो. याव्यतिरिक्त शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे म्हणजेच डिहायड्रेशन, जेवणाच्या अनियमित वेळा आणि रक्तातील साखरेचे कमी झालेले प्रमाण यामुळेही मुले डोकेदुखीची तक्रार करतात. काही मुलांमध्ये चॉकलेट, कॅफिनयुक्त पेये किंवा विशिष्ट प्रक्रिया केलेले पदार्थ खाल्ल्यामुळे डोकेदुखीची लक्षणे बळावतात.

डोकेदुखी सामान्य असेल, तर डॉक्टर पॅरासिटामॉल किंवा आयबुप्रोफेनसारखी वेदनाशामक औषधे योग्य डोसमध्ये सुचवतात. मात्र, पालकांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही औषधे देऊ नयेत. मुलाला डोकेदुखीसोबत मानेमध्ये कडकपणा, खूप ताप, फिटस् येणे किंवा दृष्टी धूसर होणे असा त्रास होत असेल, तर तातडीने सीटी स्कॅन किंवा एमआरआयसारख्या चाचण्या करण्याची गरज असते. सायनसमुळे डोके दुखत असल्यास प्रतिजैविकांचा वापर प्रभावी ठरू शकतो.

औषधोपचारांसोबतच जीवनशैलीत बदल करणे हा मुलांच्या डोकेदुखीवर सर्वात प्रभावी उपाय आहे. मुलांना दररोज किमान ८ ते १० तास शांत झोप मिळायलाच हवी. त्यांच्या आहारात पालेभाज्या, फळे आणि पुरेसे पाणी यांचा समावेश असावा. अभ्यासाच्या किंवा खेळाच्या दरम्यान ठरावीक अंतराने विश्रांती घेणे गरजेचे आहे.

आजच्या काळात पालकांनी मुलांच्या स्क्रीन टाईमवर मर्यादा घालणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नियमित शारीरिक व्यायाम आणि योगासनांमुळे मानसिक ताण कमी होतो, ज्यामुळे डोकेदुखीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटते. जमुलाला वारंवार आणि तीव्र डोकेदुखी होत असेल, तर वैद्यकीय तज्ज्ञांकडून डोळ्यांची आणि आरोग्याची संपूर्ण तपासणी करून घेणे हाच सुरक्षित मार्ग ठरतो.

# महिलांनो, ९ सुपरफूड्स खायला सुरुवात करा; वाढेल सौंदर्य, हार्मोनल बॅलन्स आणि दीर्घायुष्य

महिलांच्या शरीरात वयाच्या प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळे बदल होत असतात. किशोरावस्था, गर्भधारणा, प्रसूतीनंतरचा काळ, PCOS, मेनोपॉज अशा अनेक टप्प्यांमध्ये हार्मोन्समध्ये चढ-उतार होत राहतात. याचा परिणाम केवळ शरीरावरच नाही तर त्वचा, मानसिक आरोग्य, वजन, हाडे आणि इम्युनिटीवरही होतो. त्यामुळे महिलांसाठी योग्य आहार हा फक्त पोट भरण्यासाठी नसून संपूर्ण आरोग्य टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

रजिस्टर्ड डायटिशियन कॅटलिन बील यांच्या मते, काही खाद्यपदार्थ महिलांच्या शरीरासाठी विशेष फायदेशीर ठरतात. हे फूड्स हार्मोनल बॅलन्स राखण्यास, वाढत्या वयाचे परिणाम कमी करण्यास, हाडे मजबूत ठेवण्यास आणि त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करू शकतात.

**बेरीज महिलांसाठी का आहेत फायदेशीर?**

ब्लूबेरी, स्ट्रॉबेरी आणि रास्पबेरीसारख्या बेरीजमध्ये फायबर, व्हिटॅमिन C आणि अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. या घटकांमुळे पचनक्रिया सुधारते आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते.

बेरीजमध्ये असलेले अँथोसायनिन्स आणि फ्लेव्होनॉइड्स शरीरातील पेशींना होणारे नुकसान कमी करतात. संशोधनानुसार अशा फूड्सचे नियमित सेवन केल्याने हृदयरोग, टाइप-२ डायबिटीज आणि मानसिक अशक्तपणाचा धोका कमी होऊ शकतो. विशेषतः वृद्ध महिलांमध्ये बेरीज खाल्ल्याने मेंदूचे आरोग्य आणि सक्रियता चांगली राहते.

**फॅटी फिशमधील ओमेगा-३ महिलांसाठी महत्त्वाचे**

साल्मन, सार्डिन आणि मॅकेरलसारख्या फॅटी फिशमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड मुबलक प्रमाणात असते. हे हेल्दी फॅट हृदय आणि मेंदू दोन्ही निरोगी ठेवण्यास मदत करते.

वाढत्या वयात शरीरात सूज वाढण्याची समस्या दिसून येते. यामुळे मेटाबॉलिझम आणि गट हेल्थवर परिणाम होतो. ओमेगा-३ सूज कमी करण्यास मदत करत असल्याने दीर्घकाळ आरोग्य चांगले राहू शकते. काही संशोधनांमध्ये शरीरात ओमेगा-३चे प्रमाण अधिक असलेल्या महिलांमध्ये मृत्यूचा धोका कमी असल्याचे दिसून आले आहे.

**डाळी आणि बीन्स शरीरासाठी पोषणाचा खजिना**

मसूर, हरभरा, राजमा आणि विविध प्रकारच्या डाळींमध्ये फायबर आणि प्लांट-बेस्ड प्रोटीन भरपूर असते. हे घटक रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास आणि गट हेल्थ सुधारण्यास मदत करतात.

डाळी आणि बीन्समधील प्रोटीन स्नायू मजबूत ठेवण्यासाठी उपयुक्त मानले जाते. संशोधनानुसार वनस्पतीजन्य प्रोटीनचे सेवन वृद्ध महिलांमध्ये हृदयरोग आणि डिमेन्शियाचा धोका कमी करू शकते. नियमित डाळी खाणाऱ्या महिलांमध्ये दीर्घायुष्याचे प्रमाणही अधिक असल्याचे काही अभ्यासांत



आढळले आहे.

**नट्स आणि सीड्समुळे मिळते हेल्दी फॅट्सची ताकद**

बदाम, अक्रोड, चिया सीड्स आणि जवस यांसारख्या पदार्थांमध्ये हेल्दी फॅट्स, फायबर आणि प्लांट प्रोटीन भरपूर असते. हे घटक महिलांच्या हृदयासाठी आणि हार्मोनल आरोग्यासाठी फायदेशीर मानले जातात.

संशोधनानुसार नियमित नट्स खाल्ल्याने हृदयरोग आणि टाइप-२ डायबिटीजचा धोका कमी होऊ शकतो. आठवड्यातून दोन वेळा किंवा त्यापेक्षा अधिक नट्स खाणाऱ्या महिलांमध्ये हृदयविकारामुळे मृत्यूचा धोका कमी असल्याचेही अभ्यासांत समोर आले आहे.

**संपूर्ण धान्ये वजन आणि मेटाबॉलिझमसाठी उपयुक्त**

ओट्स, क्विनोआ आणि ब्राउन राईससारख्या साबूत धान्यांमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. हे पदार्थ पचन सुधारतात आणि शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतात.

साबूत धान्यांचे सेवन केल्याने वजन वाढण्याचा धोका कमी होऊ शकतो. तसेच हृदयरोग, स्ट्रोक आणि टाइप-२ डायबिटीजचा धोका कमी करण्यास मदत मिळते. महिलांमध्ये अशा धान्यांचे नियमित सेवन दीर्घकाळ आरोग्य चांगले ठेवण्यासाठी उपयुक्त मानले जाते.

**दही आणि फर्मेंटेड डेअरी फूड्स हाडांसाठी फायदेशीर**

दही आणि केफिरसारखे फर्मेंटेड डेअरी पदार्थ महिलांच्या शरीरासाठी विशेष फायदेशीर समजले जातात. यात असलेले कॅल्शियम हाडे मजबूत ठेवण्यास मदत करते आणि वाढत्या वयात होणारा बोन लॉस कमी करू शकते.

या पदार्थांमध्ये असलेले प्रोबायोटिक्स गटमधील चांगले बॅक्टेरिया वाढवतात आणि इम्युनिटी मजबूत करतात. नियमित दही खाल्ल्याने हाडांची ताकद वाढण्यास मदत होऊ शकते.

**ऑलिव्ह ऑइल सूज कमी करण्यास मदत करते**

ऑलिव्ह ऑइलमध्ये हेल्दी फॅट्स आणि पॉलीफेनॉल्स आढळतात. हे घटक शरीरातील सूज कमी करण्यास आणि पेशींना होणारे नुकसान कमी करण्यास मदत करतात.

मेडिटेरेनियन डाएटमध्ये ऑलिव्ह ऑइलला विशेष महत्त्व दिले जाते. संशोधनानुसार यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होऊ शकतो. मेनोपॉजनंतर महिलांच्या हाडांच्या आरोग्यासाठीही हे उपयुक्त ठरू शकते.

**क्रूसिफेरस भाज्या शरीराची डिटॉक्स प्रक्रिया सुधारतात**

ब्रोकली, फ्लॉवर आणि ब्रसेल्स स्प्राउट्ससारख्या भाज्यांमध्ये फायबर आणि व्हिटॅमिन C भरपूर प्रमाणात असते. यामुळे इम्युनिटी मजबूत राहते.

या भाज्यांमध्ये ग्लुकोसिनोलेट्स नावाचे वनस्पती घटक असतात, जे शरीरातील डिटॉक्स प्रक्रियेला मदत करतात आणि ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करतात. संशोधनानुसार अशा भाज्यांचे सेवन कॅन्सर आणि हृदयरोगाचा धोका कमी करू शकते.

**एवोकाडो महिलांच्या हृदयासाठी सुपरफूड**

एवोकाडोमध्ये हेल्दी फॅट्स, फायबर, पोटॅशियम आणि पॉलीफेनॉल्स भरपूर प्रमाणात असतात. हे घटक हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात.

संशोधनानुसार एवोकाडो खाल्ल्याने खराब LDL कोलेस्टेरॉल कमी होऊ शकते. तसेच पोटावरील धोकादायक चरबी कमी करण्यासही मदत होऊ शकते. विशेषतः महिलांमध्ये डायबिटीज आणि अकाली मृत्यूचा धोका कमी करण्यासाठी हे फायदेशीर मानले जाते.

**महिलांनी आहारात संतुलन राखणे गरजेचे**

तज्ज्ञांच्या मते, कोणताही एक पदार्थ चमत्कार करू शकत नाही. मात्र संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि ताणतणाव नियंत्रण या गोष्टींसोबत हे सुपरफूड्स घेतल्यास महिलांचे आरोग्य दीर्घकाळ चांगले राहू शकते.

# दररोज भिजवलेले अक्रोड खाण्याचे जबरदस्त फायदे; जाणून घ्या

हिवाळ्यात निरोगी राहण्यासाठी सुक्या मेव्याचा आहारात समावेश करणे गरजेचे आहे. रोज सुका मेवा खाल्ल्याने हृदय, मन व शरीर तंदुरुस्त राहते. सुका मेवा खाल्ल्याने वजन कमी तर होतेच. त्याशिवाय रोगप्रतिकारक शक्तीही वाढते. अक्रोड आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. अक्रोडमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर व आरोग्यदायी चरबी यांसारखे अनेक पोषक घटक असतात, जे मेंदूला गती देऊ शकतात. त्यासोबतच अनेकांची स्मरणशक्तीही यामुळे वाढवते. थायरॉइडसारख्या समस्या दूर करण्यासाठीही सुका मेवा प्रभावी ठरू शकतो. अक्रोड पोषक तत्त्वांनी समृद्ध असतात. त्यामुळे केवळ एकच नाही, तर अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात. विशेषतः, भिजवलेले अक्रोड



खाल्ल्याने शरीराला प्रथिने, फायबर, आरोग्यदायी चरबी, जीवनसत्त्वे आणि मॅग्नेशियम, फॉस्फरस, तांबे व मँगनीज यांसारखी खनिजे मिळतात. म्हणून दररोज भिजवलेले अक्रोड खाण्याचे आरोग्यावरील चांगले परिणाम आणि त्यातून मिळणाऱ्या फायद्यांविषयी जाणून घ्या.

अक्रोडचा वापर सुका मेवा म्हणून केला जातो. अक्रोड हे मेंदूच्या कार्यक्षतेसाठी खूप फायदेशीर मानले जातात. अक्रोडमध्ये पोषक घटक मुबलक प्रमाणात असतात. हे सर्व घटक आपल्या शरीराला विविध रोगांशी लढण्यात मदत करतात आणि शरीराला त्याचा फायदा होतो. अक्रोडमध्ये भरपूर फायबर्स असतात. त्यामुळे आपली पचनक्रिया निरोगी राहते. त्यासोबतच भिजवलेले अक्रोड पचायलाही सोपे असतात.

**भिजवलेले अक्रोड खाण्याचे फायदे**

दररोज भिजवलेले अक्रोड खाल्ल्याने हाडे मजबूत होतात. अक्रोडांमधून हाडांना केवळ खनिजेच नव्हे, तर ओमेगा-३ फॅटी ॲसिडदेखील मिळतात, ज्यामुळे कॅल्शियमचे शोषण सुधारते.

भिजवलेले अक्रोड खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य चांगले राहते. अक्रोड शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल बाहेर टाकण्यास, रक्तवाहिन्यांचे कार्य सुधारण्यास आणि सूज कमी करण्यास मदत करतात, ज्यामुळे हृदयविकारांचा धोका कमी होऊ शकतो.

भिजवलेले अक्रोड खाणे मेंदूसाठी फायदेशीर आहे. ते मेंदूच्या ऊतींचे संरक्षण करते आणि ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करते.

भिजवलेल्या अक्रोडांमुळे आतड्यांचे आरोग्य चांगले राखण्यासाठीदेखील फायदे होतात. त्यातील फायबर आतड्यांचे आरोग्य सुधारते आणि आतड्यातील जीवाणूंना दूर ठेवण्यास मदत करते.

अक्रोडमध्ये फायबर भरपूर प्रमाणात असल्याने, ते वजन कमी करण्यास मदत करतात आणि तुम्हाला जास्त वेळ पोट भरल्यासारखे वाटते.

आरोग्याच्या दृष्टीने तुम्ही दिवसातून दोन ते तीन भिजवलेले अक्रोड खाऊ शकता. अक्रोड रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ते खा.

# लोणचं वर्षभर होणार नाही खराब, वापरा या सिक्रेट ट्रिक्स

सर्वप्रथम जी फळे आपण वापरणार आहोत ती फळे ताजी घ्यावीत.लोणच्यासाठी लागणारे फळे स्वच्छ धुवावीत.लोणचं बनवताना बरणीत पाण्याचा लवलेशही नसावा. बरणी धुतल्यावर कडक उन्हात किंवा फॅनखाली पूर्णपणे वाळवावी. लोणचं साठवण्यासाठी फक्त काचेची किंवा चिनी मातीची बरणी वापरावी. प्लास्टिकमध्ये लोणचे लवकर खराब होते. लोणच्यावर किमान २ इंच तरी तेलाचा थर असावा. यामुळे बुरशी लागत नाही. लोणच्यामध्ये अधिक प्रमाणात मीठ घालावे.लोणच्याच्या फोडी तयार करताना स्टीलच्या सुरीचा वापर करावा.लोणचं



थंड झाल्यानंतर बरणीत भरा. यामुळे लोणचे खराब होणार नाही.लोणच्यासाठी स्वच्छ, कोरडा आणि लाकडी किंवा स्टीलचा चमचा वापरावा. दररोज लागणारे लोणचं एका छोट्या काचेच्या बरणीत काढून घ्यावे. त्यामुळे साठवण करुन ठेवलेल्या बरणीत दररोज चमचा घालावा लागणार नाही आणि लोणचं खराब होणार नाही.बरणी दमट आणि अंधाराच्या ठिकाणी ठेवू नये. लोणच्याला बुरशी लागल्याचे वाटत असेल तर वरचा थर काढून टाकावा आणि लोणचे उन्हात ठेवून त्यात थोडे गरम तेल घालावं.